107

फक्त कार्यालयीन उपयोगाकरिता

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

# शासकीय आश्रमशाळेतील प्रवेश, निकाल, गळती यांचे पृथःकरण करुन आढळून येणाऱ्या त्रुटींबाबत उपाय योजना सुचविणे

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,

२८, क्वीन्स गार्डन, पुणे - ४११ ००१.

१९९४

## प्रस्तावना

आदिवासी जमाती शतकानुशतके भौगोलिकदृष्टया एका विशिष्ट भागात विशेषतः जंगले व डोंगराळ भागात वास्तव्य करुन असल्यामुळे इतर समाजाशी त्यांचा फारच कमी प्रमाणात संबंध आल्याचे दिसून येते. त्यामुळे आदिवासी समाजाची सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उन्नती ही इतर समाजाच्या तुलनेत कमी दिसून येते. आदिवासी समाजात चेतना निर्माण करावयाची असल्यास मुख्यत्वे करुन त्यांना आधुनिक पध्दतीचे शिक्षण देणे क्रमप्राप्त ठरते. आणि म्हणून शासनाने आदिवासींना मोठया प्रमाणावर शिक्षण देण्याचे दृष्टीने कार्यवाही करण्यासाठी निरनिराळया योजना आखल्या. त्यापैकी एक म्हणजे आदिवासी जमाती ज्या ज्या भौगोलिक क्षेत्रात राहतात, त्या त्या ठिकाणी आश्रमशाळा उघडणे. या कार्याची सुरवात ख-या अर्थाने 1972 पासून सुरु झाली व या 22 वर्षात शासकीय आश्रमशाळा योजना मोठया प्रमाणात महाराष्ट्रात सुरु झाली. यापैकी ब-याच आश्रमशाळा निरनिराळया स्वयंसेवी संस्था चालवित आहेत. सध्या महाराष्ट्रात एकूण 602 आश्रमशाळा असून त्यापैकी शासकीय आश्रमशाळा 405 आहेत व जवळ जवळ 200 आश्रमशाळा या स्वयंसेवी संस्थामार्फत पण शासनाच्या मदतीने चालवित आहेत.

आश्रमशाळांची सुरवात करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे आदिवासी मुलांना शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी व पालकांना सुध्दा आपल्या मुलांना शाळेत पाठविण्याची प्रवृत्ती निर्माण व्हावी या उद्देशाने मुख्यत्वे करुन आश्रमशाळा निरनिराळया भागात काढण्यात आल्या. आश्रमशाळांचे वैशिष्ठ म्हणजे हया आश्रमशाळा निवासी आश्रमशाळा असून आदिवासी मुला-मुलींना 6 व्या वर्षापासून या ठिकाणी दाखल करता येते व दहावीपर्यंत शिक्षण, राहण्याची, जेवणाची, कपडलत्ते हा सर्व खर्च शासनामार्फत करण्यात येतो. म्हणजेच पालकांना आपल्या मुलांच्या शिक्षणासाठीच नव्हे तर त्यांच्या जेवणाचा खर्च, कपडयांचा खर्च सुध्दा करावा लागत नाही. वास्तविक एवढया मोठया प्रमाणावर आश्रमशाळा शाळा सुरु झाल्यानंतर खरे तर सर्व आदिवासी मुलांनी शिक्षण घेतले असते. परंतू प्रत्यक्षात तसे आढळून येत नाही. एवढेच नव्हे तर ज्या मुलांना शाळेत दाखल केले जाते, त्यातून सुध्दा फारच कमी मुले 10 वी पर्यंत शिक्षण घेतात. म्हणजे निरनिराळया वर्गातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण मोठया प्रमाणावर असल्याचे आढळून येते. याची कारणे काय असावीत, याचा शोध घेणे, आदिवासी समाजाच्या उन्नतीच्या दृष्टीने एक महत्वाचे पाऊल ठरणार आहे आणि तो प्रयत्न या मूल्यमापन अहवालाद्वारे करण्याचा प्रयत्न केला आहे.

जरी 600 पेक्षा जास्त आश्रमशाळा असल्या तरी प्रत्येक आश्रमशाळेत जाऊन तपासणी करणे हे केवळ अशक्य असल्याने त्यापैकी प्रत्येक जिल्हयातील काही निवडक आश्रमशाळांचे सर्व्हेक्षण करण्यात आले. अशा आश्रमशाळांची संख्या 50 आहे. मात्र गडचिरोली, चंद्रपूर जिल्हयातील कोणत्याही आश्रमशाळांचे सर्व्हेक्षण करता येणे काही अपरिहार्य कारणांमुळे शक्य झाले नाही. ती एक त्रुटी या अहवालात असली तरी सर्वसाधारण काढलेले निष्कर्ष त्या जिल्हयातील आश्रमशाळांना लागू पडतात, याबद्दल शंका वाटत नाही.

गळतीची कारणमिमांसा केली असता असे दिसून येईल की मुख्यत्वे करून आर्थिक कारणे, आश्रमशाळांतील सोयी-सवलतींचा काही प्रमाणात अभाव, शिक्षणाबद्दल अनास्था, वैद्यकिय सोयींचा अभाव, बालविवाह प्रथा, पारंपारिक व्यवसायाकडे कल, या बाबींचा समावेश होतो. तसेच लहान वयात म्हणजे 6 व्या वर्षी मुलाला आई-वडिलांपासून लांब राहणे आवडत नसल्याने पालक व मुलांना ताटातूट सहन होत नाही. म्हणून मुलांना शाळेतून काढण्याकडे पालकांचा कल असतो. या व अशा अनेक कारणांचा उहापोह प्रस्तुत संशोधन अहवाल विस्ताराने करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत संशोधन अहवाल हा संशोधक, सामाजिक कार्यकर्ते तसेच शासकीय कर्मचा-यांना अत्यंत उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. प्रस्तुत अहवाल तयार करण्याचे काम या संस्थेतील श्रीमती मंगला घोडे, संशोधन अधिकारी, श्री.जी.के.जाधव, मुख्य लिपिक व श्री.आय.आर.तडवी, अन्वेषक यांनी केले. तसेच श्री.प्र.ज.वाणी, उपसंचालक यांनी वेळोवेळी या संशोधन अहवालासंदर्भात योग्य त्या सूचना दिल्या. हा अहवाल तयार करण्यासाठी ज्या आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांनी प्रश्नावलीमार्फत माहिती पाठविली, त्यांची ही संस्था आभारी आहे. या माहितीचा वर नमूद केलेल्यांना उपयोग होईलच. तसेच मुख्याध्यापक व शिक्षक यांना हा अहवाल मार्गदर्शक व उपयुक्त ठरेल, अशी खात्री वाटते. तसेच या निमित्ताने काही निर्णय शासनास व आदिवासी विकास आयुक्त यांना घेणेही क्रमप्राप्त ठरेल. त्यांनाही हा अहवाल उपयुक्त ठरेल, असे वाटते.

पुणे

दिनांक- 16 एप्रिल,1994

(डॉ.नवीनचंद्र जैन)
संचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे 1

# अ नु क मा णि का


| अ.क्र. | प्रकरण | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | | प्रस्तावना | |
| 1. | प्रकरण 1 ले | महाराष्ट्र राज्यातील शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षणावर दृष्टीक्षेप | 1 |
| 2. | प्रकरण 2 रे | मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी, उद्दिष्टये आणि सर्व्हेक्षण पध्दती | 8 |
| 3. | प्रकरण 3 रे | सर्व्हेक्षण आकडेवारीचे संकलन व त्यावरील पार्श्वभूमी | 13 |
| 4. | प्रकरण 4 थे | क्षेत्रीय पाहणी अहवाल- विवेचन | 44 |
| 5. | प्रकरण 5 वे | क्षेत्रीय निरीक्षण व गळतीची कारणे | 53 |
| 6. | प्रकरण 6 वे | आश्रमशाळेतील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची गळती कमी करण्यासाठी उपाययोजना | 65 |

# प्रकरण 1 ले

## महाराष्ट्र राज्यातील शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षणावर दृष्टीक्षेप

**प्रास्ताविक :-**

आदिवासी व त्यांचे मोठया प्रमाणात वास्तव्य असलेले क्षेत्र यांना भारतीय राज्य घटनेत विशेष संरक्षण देण्यात आले आहे. भारतीय घटनेच्या कलम {46} अन्वये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या मुलामुलींसाठी शैक्षणिक व आर्थिक बाबींची काळजी घ्यावयाची तरतूद आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात आदिवासींचे शिक्षणासाठी काही प्रयत्न झालेले दिसतात. ख्रिस्ती मिशन-यांकडून इ.स.1920 मध्ये ठाणे जिल्हयातील पालघर, डहाणू व उंबरगांव येथे प्राथमिक शाळा उघडल्या पण अनेक कारणांनी त्या शाळा चालल्या नाहीत. नंतरच्या काळात अनेक संस्था व व्यक्तींनी आदिवासींच्या विकासासाठी शिक्षण हे मध्यवर्ती सूत्र करून कार्य केले.

1.1 मुंबई सरकारच्या शिक्षण खात्याने आदिवासींच्या शिक्षणातील महत्वाची अडचण म्हणजे त्यांची आर्थिक दुर्बलता हे शासनाच्या निदर्शनास आणून दिले. 1928 साली नेमलेल्या स्टार्ट समितीने आदिवासींच्या शिक्षणाचा वेग वाढविण्यासाठी शाळांना जोडून वसतीगृहे काढण्यात यावीत, असे सुचविले.

1938 साली डी सिमिंग्टन, आय.सी.एस.या अधिका-याने आपला अहवाल सादर केला. त्यांनी आपल्या अहवालात आदिवासींच्या शिक्षणासाठी आश्रमशाळा काढण्यात याव्यात व प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे, हया शिफारशी केल्या. 1942 साली नेमलेल्या मॅकमिलन समितीने मागास जमातीच्या विकासासाठी खास वेगळा निधी ठेवण्यात यावा अशी महत्वाची शिफारस केली. 1947 साली श्री.वांद्रेकर यांच्या अध्यक्षतेखाली आदिवासींच्या विकासाबाबत विचार करण्यासाठी समिती नेमण्यात आली. आचार्य भिसे या समितीचे सदस्य होते. ठाणे जिल्हयातील आदिवासींचा विशेष अभ्यास करून त्यांनी आपल्या अहवालात शासनाला खालील महत्वाच्या सूचना केल्या.

1. आदिवासी क्षेत्रात सक्तीचे प्राथमिक शिक्षण असावे.
2. दर दहा प्राथमिक शाळांत एक मध्यवर्ती शाळा असावी.
3. आश्रमशाळेला जोडून वसतीगृहाची व्यवस्था असावी.
4. आश्रमशाळेच्या स्वतंत्र इमारती व शिक्षकांना निवासस्थाने बांधावीत.
5. शेती शिक्षणाची व्यवस्था व्हावी.

1.2 या समितीच्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचे शासनाने ठरविले व 1954 साली जव्हार तालुक्यातील तलवडे या गांवी पहिली आश्रमशाळा उघडण्यात आली. या आश्रमशाळेद्वारे आदिवासी शिक्षणाला गती देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

योजना आयोगाने नेमलेल्या ओ.शि.ओ.कमिटीने 1969 साली आपल्या अहवालात खालील महत्वाच्या शिफारशी केल्या आहेत.

1. प्राथमिक शिक्षणास पूर्व प्राथमिक शिक्षणाची जोड देण्यात यावी व बालवाडी सुरु करण्याच्या योजनेस उत्तेजन द्यावे.

2. ज्या एक शिक्षकी शाळांचे काम असमाधानकारक आहे त्या बंद करुन त्या भागात आश्रमशाळा सुरु करावी.

3. आदिवासी मुलींच्या शिक्षणाचा प्रश्न स्वतंत्रपणे हाताळला पाहिजे. याकरिता नेहमीच्या शिक्षणाबरोबर त्यांना गृहशास्त्रांचे शिक्षण दिले जाईल, अशा स्वतंत्र आश्रमशाळांची सूचना समितीने केली आहे.

4. चांगल्या शिक्षकांना आदिवासी भागात आकर्षित करण्यासाठी मोफत राहण्याची घरे आणि जादा खास वेतन यासारखी आकर्षणे आवश्यक आहेत.

1.3 सर्वसाधारणपणे अनुसूचित जमातीमध्ये शिक्षणाबद्दल कमालीची उदासिनता दिसून येते. कारण या समाजामध्ये पारंपारिक व्यवसाय करण्याकडे लोकांचा जास्त ओढा असतो. मुली आईला घरकामात मदत करतात. इतर वेळी गुरे सांभाळतात. लाकुडफाटा, गवत, कंदमुळे इ.वस्तु गोळा करण्यात मदत करतात. तर मुले शेतीच्या हंगामात शेतीवर काम करतात व इतरवेळी गुरे सांभाळण्यात, शिकार करणे, मासे मारणे, पाणी भरणे, लहान भावंडांना सांभाळणे इ.अर्थप्राप्ती करुन देणा-या गोष्टी करत असतात. त्यामुळे शिक्षण घेऊन फार मोठा फायदा होईल असे त्यांना वाटत नाही. मुलांची शाळेत नोंद झाल्यावर काही वर्षातच शिक्षण थांबते. मुलींचे शिक्षण इयत्ता 1 ते 4 च्या आतच थांबते. त्याची विविध कारणे काय असतील याचा साकल्याने विचार करण्याची अत्यंत गरज आहे. आदिवासी आश्रमशाळेमध्ये पाल्याला पुरविल्या जाणा-या सुविधा व शैक्षणिक सवलती या मोफत पुरविल्या जातात असे असूनही आश्रमशाळेमध्ये गळती होण्याची कारणे काय असावीत हे जाणून घेण्यासाठी गळतीसंबंधी मूल्यमापन अभ्यास करुन गळतीच्या कारणांची मिमांसा करणे व त्यावर उपाययोजना सुचविणे हे क्रमप्राप्त झाले आहे.

1.4 त्यासाठी महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची वर्गवार (इयत्ता वार) गळती पाहणे संयुक्तिक होईल.

तक्ता क्र.1.1

1.5 महाराष्ट्रातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अनुसूचित जमातीमधील शाळेत जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या 1988-89

| अ.क्र. | इयत्ता | अनुसूचित जमातीच्या शाळेत जाणा-या विद्यार्थ्यांची संख्या 1988-89 |
|---|---|---|
| 1. | पूर्व प्राथमिक | 3,833 |
| 2. | 1 ली ते 4 थी | 2,93,931 |
| 3. | 5 वी ते 7 वी | 73,336 |
| 4. | 8 वी ते 10 वी | 35,683 |
| 5. | 11 वी ते 12 वी | 4,319 |

संदर्भ :- "एज्युकेशन ॲट ए ग्लान्स- 1988-89

§अ§ वरील तक्त्यावरुन असे निदर्शनास येते की, अनुसूचित जमातीमध्ये पूर्व प्राथमिक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण अल्प आहे.

§ब§ 1 ली ते 4 थी मध्ये नोंदलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे

§क§ 5 वी ते 7 वी मध्ये विद्यार्थी येईपर्यंत मोठया संख्येने मुले शाळेतून गळाल्याचे दिसून येते. 75 टक्के मुले या वर्गात येईपर्यंत गळाल्याचे वरील आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

§ड§ 8 वी ते 10 वी पर्यंत आणखी निम्मी मुले गळाल्याचे दिसून येते. एकूण

(ड) 8 वी ते 10 वी पर्यंत आणखी निम्मी मुले गळाल्याचे दिसून येते. एकूण 12.13 टक्के मुले शाळेत टिकून राहिले.

(इ) इ.1 ली ते 4 थी मध्ये दाखल झालेल्या मुलांच्या संख्येशी इ.11 वी व 12 वी मध्ये शिकत असलेल्या मुलांचे प्रमाण अत्यल्प असल्याचे वरील तक्त्यावरुन दिसून येते.

वरील तक्त्यावरुन 11 वी व 12 वी मध्ये विद्यार्थी येईपर्यंत 52.41 टक्के मुले गळाल्याचे दिसून येते. तर कॉलेजचे शिक्षण घेणा-या मुलांमध्ये जेमतेम 1.46 टक्के मुलांचा समावेश होतो.

महाराष्ट्र राज्यातील 1961 ते 1991 च्या खानेसुमारीनुसार गेल्या 40 वर्षातील सर्वसामान्य व अनुसूचित जमाती यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण पाहिले असता स्वातंत्र्यानंतरही आपण शैक्षणिक प्रगती फारशी करु शकलो नाही, असे दिसून येते.

तक्ता क.1.2.

महाराष्ट्रातील आदिवासींचे साक्षरतेचे प्रमाण

| अ. क्र. | वर्ष | सर्वसामान्य साक्षरता प्रमाण | | | आदिवासी साक्षरता प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष टक्के | स्त्रिया टक्के | एकूण टक्के | पुरुष टक्के | स्त्रिया टक्के | एकूण टक्के |
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. |
| 1. | 1961 | 42.04 | 16.76 | 29.82 | 12.55 | 1.75 | 7.21 |
| 2. | 1971 | 51.04 | 26.43 | 39.13 | 19.06 | 4.21 | 11.74 |
| 3. | 1981 | 58.65 | 34.63 | 47.02 | 32.38 | 11.94 | 22.29 |
| 4. | 1991 | 74.80 | 50.50 | 63.10 | उ.ना. | उ.ना. | उ.ना. |

संदर्भ :- 1961 ते 1991 जनगणनेनुसार.

उपरोक्त तक्त्यावरुन असे दिसून आले की, 1981 मध्ये सर्वसाधारण गटामध्ये 53 टक्के लोक निरक्षर असून अनुसूचित जमातीमध्ये 78 टक्के लोक निरक्षर आहेत. शिक्षणासाठी कोटयावधी रुपये खर्च करुन सुध्दा स्वातंत्र्यानंतर भारतातील साक्षरतेचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे वाढू शकले नाही. याचे कारण अनुसूचित जमातीतील दुर्गम भागातील लोकांना शिक्षणाचे महत्व अद्याप म्हणावे तितके पटलेले दिसत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शाळेतील दाखलातिचे प्रमाण अद्याप कमी आहे. सर्वसाधारण गटापेक्षा अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचे शाळेतील नोंदणीचे प्रमाण कमी आहे.

## 1.7 शासकीय आश्रमशाळेतील इयत्तानिहाय विद्यार्थी :-

अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे प्रमाण सर्वात कमी आहे. त्यातून मुलींचे शिक्षणाचे प्रमाण फार कमी आहे.

तक्ता क्र.1.3

शासकीय आश्रमशाळेतील इयत्तानिहाय विद्यार्थी संख्या
1991-92

| अ.क्र. | इयत्ता | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| 1. | बालवाडी | 4324 | 4310 | 8634 |
| 2. | इ.1 ली | 10087 | 6049 | 16136 |
| 3. | इ.2 री | 9238 | 5449 | 14687 |
| 4. | इ.3 री | 9140 | 5405 | 14545 |
| 5. | इ.4 थी | 7529 | 4311 | 11840 |
| 6. | इ.5 वी | 8519 | 4544 | 13063 |
| 7. | इ.6 वी | 7247 | 3573 | 10820 |
| 8. | इ.7 वी | 6891 | 2983 | 9874 |
| 9. | इ.8 वी | 4308 | 1472 | 5780 |
| 10. | इ.9 वी | 3610 | 1101 | 4711 |
| 11. | इ.10 वी | 2809 | 720 | 3529 |
| | एकूण | 73702 | 40017 | 113619 |

1) उपरोक्त तक्त्यावरुन आदिवासी विद्यार्थ्यांचे बालवाडी शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. इयत्ता 1 ली मध्ये महाराष्ट्रात 16,136 अनुसूचित जमातीचे विद्यार्थी शाळेत नांव नोंदणी होऊन दाखल झाले. इयत्ता 4 थी पर्यंत 73 टक्के विद्यार्थी शाळेत टिकून होते व उर्वरित 27 टक्के विद्यार्थी 4 थी पर्यंत गळाले होते.

इयत्ता 5 वी मध्ये विद्यार्थ्यांची संख्या 8 टक्केने वाढली होती याची कारणे जाणून घेतली असता 1) जिल्हा परिषदेच्या ज्या शाळा केवळ 4 थी पर्यंत होत्या अशा शाळांमधील विद्यार्थी आश्रमशाळेत येऊन दाखल झाले होते.

2) काही पालकांनी पाल्य लहान असून आपल्या पासून वेगळा राहू शकणार नाही म्हणून जवळच्या जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना घातले. तथापि 4 थी नंतर मूल थोडेसे मोठे झाले आहे, स्वतंत्रपणे राहू शकते म्हणून आश्रमशाळेत दाखल केले गेले.

वरील दोन कारणांमुळे इ. 5 वी मधील आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्येत वाढ झाली आहे. इयत्ता 5 वी मधून इयत्ता 6 वी मध्ये विद्यार्थी येईपर्यंत 14 टक्के विद्यार्थी गळाल्याचे आढळून आले याचे कारण जाणून घेतले असता असे आढळून आले की इंग्रजी व हिंदी हे दोन नवीन विषय इ. 5 वीत विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात येतात. या विषयांची भिती निर्माण होऊन हे विषय आपणास जमणार नाहीत असा न्यूनगंड निर्माण होऊन शाळा सोडण्याकडे विद्यार्थ्यांचा कल दिसून येतो व गळतीचे प्रमाण वाढते.

तक्ता क्र. 1:4

सर्वसाधारण मुलींचे गळतीचे प्रमाण

| अ.क्र. | इयत्ता | टक्केवारी |
|---|---|---|
| 1. | 5 वी पर्यंत गळती | 40.02 टक्के |
| 2. | 5 वी ते 8 वी | 29.43 टक्के |
| 3. | 8 वी ते 10 वी | 34.94 टक्के |

संदर्भ :- 5.4.92 चा "रविवार सकाळ" अग्रलेख

एकूण विद्यार्थीनी प्रवेश घेतात त्यापैकी 40 टक्के विद्यार्थीनी इयत्ता 5 वी च्या वर्गात येईपर्यंत गळतात. तसेच आठवी पर्यंत येईपर्यंत 29.43 टक्के विद्यार्थीनी गळतात तर माध्यमिक शाळेतील गळतीत वाढ होऊन 34.94 टक्के विद्यार्थीनी शाळा सोडून देत असल्याचे आढळून येते.

याचाच अर्थ सर्वसाधारण गटातील जेमतेम 4.41 टक्के मुली 10 वीच्या पुढील शिक्षण घेतात.

**तक्ता क. 1.5**

शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळेतील इयत्ता 10 वी च्या निकालाचा आलेख दर्शविणारा तक्ता.

| अ.क्र. | शैक्षणिक सत्र | 10 वी चे वर्ग असलेल्या शासकीय पोस्ट बेसिक आश्रमशाळा | 10 वी च्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | पास झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 1980-81 | 8 | 196 | 4 | 2.04 |
| 2. | 1981-82 | 19 | 422 | 77 | 18.94 |
| 3. | 1982-83 | 34 | 753 | 269 | 35.72 |
| 4. | 1983-84 | 57 | 1276 | 432 | 33.85 |
| 5. | 1984-85 | 74 | 1606 | 592 | 33.86 |
| 6. | 1985-86 | 82 | 1933 | 643 | 33.26 |
| 7. | 1986-87 | 91 | 2050 | 849 | 41.41 |
| 8. | 1987-88 | 101 | 2241 | 1081 | 48.19 |
| 9. | 1988-89 | 101 | 2267 | 1102 | 48.61 |

साधन : आश्रमशाळा व वसतिगृहे योजना 1989-90

उपरोक्त तक्त्यावरून शासकीय आश्रमशाळांची इयत्ता 10 वी ची पहिली बॅच 1980-81 ला बाहेर पडली. प्रथम वर्षी 10 वी मध्ये पास होणा-या विद्यार्थ्यांची टक्केवारी 2.04 इतकी होती व परिक्षेला केवळ आठ आश्रम शाळांमधून 196 विद्यार्थी परिक्षेस बसले पैकी केवळ (4) चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यानंतर 10 वी परिक्षेत उत्तीर्ण होणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढत गेल्याचे दिसून येते.

## प्रकरण 2 रे

## मूल्यमापन अभ्यासाची पार्श्वभूमी,उद्दिष्टे आणि सर्वेक्षण पध्दती

### पार्श्वभूमी :

2.1 आदिवासींचा सामाजिक व शैक्षणिक विकास करण्याच्या दृष्टीने आश्रमशाळा ही एक महत्वाची व प्रभावी योजना आहे. शिक्षणाच्या माध्यमातून क्षेत्रविकास घडवून आणण्याच्या प्रक्रियेत आश्रमशाळा महत्वाची भूमिका बजावतात. या आश्रमशाळांद्वारे आदिवासींचा मानसिक व सांस्कृतिक विकास घडवून आणणे हे महत्वाचे उद्दिष्ट आहे.

आश्रमशाळा ही निवासी प्राथमिक शाळा असून प्रवेश दिलेल्या पाल्याला राहणे, जेवण, शैक्षणिक साहित्य, गणवेश आदि वस्तू मोफत पुरविल्या जातात. तसेच आश्रमशाळेत शिकणा-या डे-स्कॉलर्सना एक गणवेश, मध्यान्हाचे जेवण व शिक्षण मोफत दिले जाते. इतक्या सोई सवलती शासनाने पुरविल्या असल्या तरी इयत्ता 1 ली मध्ये दाखल होणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण व 10 वी पर्यंत शाळेमध्ये टिकून राहणा-या विद्यार्थ्यांचे प्रमाण यामध्ये खूप मोठी तफावत आढळून येते. त्याची मुख्याध्यापक, पालक व शिक्षक यांच्याकडून जी कारणे जाणून घेतली ती सर्वसाधारणपणे शाळा सोडून जाणे, अनुत्तीर्ण होणे, गैरहजर असणे, पालकांचे दुर्लक्ष, मुलांचा उत्पादक कामासाठी उपयोग करून घेणे, आजारपण इ. असल्याचे आढळून आले.

वरील कारणांव्यतिरिक्त गळतीची अन्य कारणे काय आहेत हे जाणून घेणे व त्यावर योग्य उपाय योजना सुचविण्यासाठी हा मूल्यमापन अभ्यास हाती घेण्यात आला.

### 2.2 मूल्यमापन अभ्यासाची उद्दिष्टे :

मूल्यमापन अहवाल तयार करण्यासाठी खालील उद्दिष्टे नजरेसमोर ठेवण्यात आली आहेत :

1. आश्रमशाळांनी विद्यार्थ्यांच्या गळतीच्या कारणांचा व प्रमाणांचा अभ्यास अहवाल करणे व गळती कमी करण्यासाठी उपाय योजना सुचविणे.
2. शासकीय आश्रमशाळेत दाखल झालेल्या विद्यार्थ्यांची जातवार टक्केवारी शोधून काढणे व ते वाढविण्याच्या दृष्टीने उपाय सुचविणे.
3. आश्रमशाळेतील वार्षिक परिक्षांचे निकाल "कमी" लागण्याची कारणे तपासणे व त्या

कारणांची मिमांसा करणे• वार्षिक परिक्षांचे निकालात सुधारणा करण्याच्या दृष्टीने उपाय योजना सुचविणे•

4• सध्या अस्तित्वात असलेल्या प्रवेश पध्दतीचा अभ्यास करणे व ती सुलभ करण्याचे दृष्टीने उपाय सुचविणे•

## 2•3 मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी आश्रमशाळांची निवड :

आदिवासी जमातीतील विद्यार्थ्यांच्या गळतीचा मूल्यमापन अभ्यास अहवाल तयार करण्यासाठी व येणारे निष्कर्ष सर्वकष स्वरुपाचे यावेत यासाठी सर्व जिल्हयातील आश्रमशाळांचा विचार करण्यात आला आहे• सर्वसाधारणपणे एका जिल्हयातून कमीत कमी एक व जास्तीत जास्त चार आश्रमशाळेची निवड करण्यात आली आहे• रस्त्यावरच्या, रस्त्यापासून थोडयाशा आत व रस्त्यापासून खूप आतल्या, डोंगराळ भागातील सहयाद्रि व गोंडवन विभागातील बेसिक व पोस्ट बेसिक उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील शासकीय आश्रमशाळांचा यामध्ये समावेश आहे• आश्रमशाळा निवडताना दुर्गम व अतिदुर्गम भागातील आश्रमशाळा निवडीचा उद्देश सफल झाला आहे• यामागील उद्देश असा की, मूल्यमापन अहवालातील निष्कर्ष सर्वकष स्वरुपाचे असावेत• सभोवतालच्या परिसराचा व डोंगराळ भागातील समस्यांचा शिक्षणावर काय परिणाम होतो हे स्पष्ट व्हावे हा यामागील हेतू आहे•

आश्रमशाळा निवडीचे विवरण खालील तक्त्यात दिलेले आहे•

तक्ता क•2•1

सर्व्हेक्षण पाहणीसाठी उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील निवडलेल्या आश्रमशाळा

| अ•क्र• | जिल्हयांची संख्या | उपयोजना क्षेत्रातील आश्रमशाळा | | उपयोजना क्षेत्राबाहेरील आश्रमशाळा | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | बेसिक | पोस्ट बेसिक | बेसिक | पोस्ट बेसिक | |
| 1• | 21 | 13 | 13 | 22 | 12 | 60 |

वरील तक्त्यामध्ये सिंधुदुर्ग, सांगली, जालना, उस्मानाबाद, लातूर, बुलढाणा असे काही जिल्हे आश्रमशाळा नसल्यामुळे तर काही जिल्हयात फारच थोडया आश्रमशाळा असल्यामुळे 6 जिल्हे वगळून उरलेल्या जिल्हयांची माहिती मागविण्यात आली आहे. आश्रमशाळांची माहिती मागविताना प्रत्येक जिल्हयातून उपयोजना क्षेत्रातील बेसिक, पोस्ट बेसिक उपयोजना क्षेत्राबाहेरील बेसिक, पोस्ट बेसिक शाळांची माहिती मागविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ज्या जिल्हयांमध्ये उपयोजना क्षेत्र नाही त्या जिल्हयात उपयोजना क्षेत्राबाहेरील माहितीसुध्दा मागविण्यात आली आहे. सर्व्हेक्षणासाठी मागविलेली माहिती "सिंपल रॅंडम" व निवड पध्दतीने मागविण्यात आली आहे व त्यावर सदरील अहवालाचे मूल्यमापन आधारलेले आहे.

## 2.4 आश्रमशाळेतून गळालेल्या विद्यार्थ्यांचा अहवाल तयार करण्यासाठी पाहणीतील संदर्भ वर्षे :

आश्रमशाळेतील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीचा अभ्यास करण्यासाठी 1989-90 हे संदर्भ वर्ष धरून 1990 पासून मागील 10 वर्षातील इयत्ता 1 ली ते 10 वी च्या विद्यार्थ्यांच्या गळतीचा अभ्यास करण्यात आला.

यामध्ये 1980-81 मध्ये इयत्ता 1 ली मध्ये नोंद झालेल्या विद्यार्थ्यांच्या गटाची टक्केवारी ते 1989-90 साली इयत्ता 10 वी मध्ये येईपर्यंत पास विद्यार्थ्यांच्या गटाच्या टक्केवारीचा अभ्यास करण्यात आला. यासाठी मागील 10 वर्षातील पास होणा-या विद्यार्थ्यांचे रेकॉर्ड मागविण्यात आले. या सॉंख्यिकी माहितीच्या आधारे सर्व्हेक्षण करण्याचे निश्चित करण्यात आले.

## 2.5 क्षेत्रिय पाहणी :

क्षेत्रिय कामकाज पाहणीसाठी प्रत्यक्ष आश्रमशाळांना भेटी देण्याचे निश्चित करण्यात आले यासाठी सह्याद्री विभागातील पुणे, नाशिक, नगर हे 3 जिल्हे व गोंडवन विभागातील अमरावती व यवतमाळ हे जिल्हे निवडण्यात आले. गडचिरोली व चंद्रपूर हे दोन जिल्हे क्षेत्रीय पाहणीसाठी निवडण्याची इच्छा असताना अपू-या कर्मचारी वर्गामुळे तेथील क्षेत्रीय कामकाज हाती घेता आले नाही. तसेच बेसिक व पोस्ट बेसिक आश्रमशाळांची निवड करताना दुर्गम व अतिदुर्गम भागही विचारात घेतला. प्रत्येक जिल्हयातील कमीत कमी 4 तालुके व प्रत्येक तालुक्यातील कमीत कमी एक आश्रमशाळा पाहणीसाठी निवडण्यात आली. क्षेत्रिय पाहणीमध्ये जिल्हा, तालुका, गांव व कुटुंब स्तरावरील माहिती व प्रशासकीय अधिका-यांचे अभिप्राय मुलाखतीद्वारे गोळा करण्यात आले.

2.6 **पाहणीत भरावयाची पत्रके :**

क्षेत्रिय पाहणीमध्ये तालुका/गांव व कुटुंब स्तरावरील माहिती गोळा करण्यात आली. मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, विद्यार्थी व शिक्षण विभागाचे अधिकारी किंवा सामाजिक कार्यकर्ते यांचे अभिप्राय जाणून घेण्यात आले. यासाठी चार प्रकारची पत्रके तयार करून त्यामध्ये माहिती गोळा केली आहे.

| प्रपत्र क्र. | विषय |
|---|---|
| 1. | कुटुंब पत्रक |
| 2. | शिक्षण विभागांचे अधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांचे अभिप्राय प्रश्नावली |
| 3. | मुख्याध्यापकांसाठी शैक्षणिक माहिती पत्रक. |
| 4. | परिशिष्ट क्र. 5<br>गळणा-या मुलांसाठी प्रश्नावली |

या व्यतिरिक्त जिल्हा परिषदेतील शाळांमधील शिक्षकांच्या मुलाखती घेऊन मते आजमावण्यात आली. परंतु यासाठी स्वतंत्र प्रश्नावली तयार करण्यात आली नाही.

प्रपत्र क्र.1: ज्या मुलांची अगर मुलींची शाळेतून कोणत्याही कारणास्तव गळती झालेली आहे अशा विद्यार्थ्यांच्या पालकांशी/कुटुंबांशी संपर्क साधून ह्या पत्रकातील सर्व माहिती गोळा केली आहे.

प्रपत्र क्र.2: शिक्षण विभागाचे अधिकारी/सामाजिक कार्यकर्त्यांसाठी प्रश्नावली :

गावांमध्ये अगर तालुक्यामध्ये शिक्षण क्षेत्रात काम केलेल्या अगर ज्याला शिक्षणाबाबत आस्था असून त्यामध्ये सुधारणा होण्यासाठी प्रयत्न केला असेल अशा सामाजिक कार्यकर्त्यांकडून ही प्रश्नावली भरून घेतली आहे. त्याचप्रमाणे आदिवासी विभागामध्ये ज्या शिक्षकांनी जिल्हा परिषद शिक्षकां व्यतिरिक्त बरीच वर्षे सेवा केली आहे अशा शिक्षकांकडून त्यांचे विचार व सूचना नोंदण्यासाठी या प्रश्नावलीचा उपयोग करून त्यामध्ये माहिती भरली आहे.

परिशिष्ट क्र.5: शाळेतून नापास होणा-या/गळणा-या मुलांसाठी प्रश्नावली :

गळती झालेल्या विद्यार्थ्यांनी कोणत्या इयत्तेतून शाळा सोडली, शाळा सोडण्याचे कारण, शाळा सोडतेवेळी वय, सध्याच्या कामाचा तपशिल व मिळणारा रोज, पुनः शाळेत जाण्याची तयारी आहे कां ? इत्यादी सर्व माहिती जाणून घेण्यासाठी नापास होणा-या किंवा शाळा सोडणा-या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेऊन माहिती गोळा करण्यात आली आहे.

## प्रकरण ३ रे

## सर्व्हेक्षण आकडेवारीचे संकलन व त्यावरील पार्श्वभूमी

3·1 सर्व्हेक्षण पाहणीसाठी निवडलेल्या महाराष्ट्र राज्यातील सर्व आश्रमशाळांमधून स्थानिक परिस्थतीनुसार कमी-अधिक प्रमाणात गळती झालेली आहे· वेगवेगळया जिल्हयांमधून निवडलेल्या आश्रमशाळातून झालेल्या गळतीच्या आधारे हा अहवाल तयार केला आहे·

सर्व्हेक्षणात जी माहिती गोळा केली आहे, त्यावरुन गळती झालेल्या मुलांच्या कुटुंबांची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक माहिती त्यांची गळती होण्याची विविध कारणे यांचे पृथःकरण खालील तक्त्यांच्या आधारे केले आहे·

तक्ता क्र•3•1

अनुसूचित जमातीनुसार साक्षर व निरक्षरतेची टक्केवारी

| अ• क्र• | जिल्हा | जमातीचे नांव | एकूण लोकसंख्या (1981 च्या जनगणनेनुसार) | | | निरक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | | साक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| 1• | ठाणे | अ• कायोडी,कातकरी | 27671 | 27161 | 54832 | 92 | 99 | 95 | 08 | 01 | 05 |
| | | ब• कोकणा,कोकणी,कुकणा | 19889 | 20026 | 39915 | 70 | 91 | 81 | 30 | 09 | 19 |
| | | क• कोळी महादेव,डोंगर कोळी | 20640 | 19557 | 40197 | 53 | 78 | 65 | 47 | 22 | 35 |
| | | ड• कोळी मल्हार | 67200 | 65476 | 132676 | 74 | 94 | 84 | 26 | 06 | 16 |
| | | इ• ठाकूर, ठाकर | 45250 | 43233 | 88483 | 83 | 97 | 90 | 17 | 03 | 10 |
| | | ई• वारली | 156153 | 155857 | 312010 | 83 | 97 | 90 | 17 | 03 | 10 |
| 2• | रायगड | अ• कायोडी,कातकरी | 37500 | 35492 | 72992 | 93 | 99 | 96 | 07 | 01 | 04 |
| | | ब• कोळी महादेव, डोंगर कोळी | 24563 | 25916 | 50479 | 47 | 77 | 62 | 53 | 23 | 38 |
| | | क• ठाकूर, ठाकर | 23,482 | 22574 | 46056 | 87 | 98 | 92 | 13 | 02 | 08 |
| 3• | रत्नागिरी | अ• कायोडी, कातकरी | 11187 | 10026 | 21213 | 97 | 99 | 98 | 03 | 01 | 02 |

•• 14 ••

| अ. क्र. | जिल्हा | जमातीचे नांव | एकूण लोकसंख्या (1981 च्या जनगणनेनुसार) | | | निरक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | | साक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| 4. | नाशिक | अ. भिल, भिल गरासिया ढोली भिल | 78646 | 77623 | 156269 | 84 | 97 | 90 | 16 | 03 | 10 |
| | | ब. कोकणा, कोकणी, कुकणी | 109162 | 107599 | 216761 | 71 | 90 | 80 | 29 | 10 | 20 |
| | | क. कोळी महादेव डोंगर कोळी | 103809 | 101599 | 205408 | 72 | 26 | 82 | 28 | 74 | 18 |
| | | ड. ठाकूर, ठाकर | 19180 | 18846 | 38026 | 85 | 97 | 91 | 15 | 03 | 09 |
| | | इ. वारली | 15794 | 15046 | 30840 | 88 | 96 | 92 | 12 | 04 | 08 |
| 5. | धुळे | अ. भिल, भिल गरासिया ढोली भिल | 258111 | 256684 | 514795 | 82 | 96 | 89 | 18 | 04 | 11 |
| | | ब. ढंका, तडवी, टेटरिया | 21252 | 21652 | 42904 | 74 | 92 | 83 | 26 | 08 | 17 |
| | | क. गामित, गमता, गावित मावची | 51080 | 51216 | 102296 | 77 | 93 | 85 | 23 | 07 | 15 |
| | | ड. कोकणा, कोकणी, कुकणा | 42747 | 42735 | 85482 | 65 | 88 | 77 | 35 | 12 | 23 |
| | | इ. कोळी, ढोर, टोकरे कोळी | 16416 | 16298 | 32714 | 50 | 83 | 67 | 50 | 17 | 33 |
| 6. | जळगांव | अ. भिल, भिल गरासिया ढोली भिल | 68370 | 66550 | 134920 | 80 | 97 | 88 | 20 | 03 | 01 |
| | | ब. कोळी ढोर, टोकरेकोळी | 11651 | 11083 | 22734 | 46 | 80 | 62 | 54 | 20 | 38 |

| अ. क्र. | जिल्हा | जमातीचे नांव | एकूण लोकसंख्या (1981 च्या जनगणनेनुसार) | | | निरक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | | साक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| 7. | अ.नगर | अ. भिल, भिल गरासिया ढेली भिल | 34145 | 33127 | 67272 | 77 | 95 | 86 | 23 | 05 | 14 |
| | | ब. कोळी महादेव, डोंगर कोळी | 37250 | 37328 | 74578 | 67 | 90 | 79 | 33 | 10 | 21 |
| | | क. ठाकर, ठाकूर | 17362 | 17396 | 34758 | 84 | 97 | 91 | 16 | 03 | 09 |
| 8. | पुणे | अ. कोळी महादेव डोंगर कोळी | 46720 | 45404 | 92124 | 55 | 85 | 70 | 45 | 15 | 30 |
| 9. | सातारा | अ. ठाकूर, ठाकर | 16587 | 16120 | 32707 | 77 | 95 | 86 | 23 | 05 | 14 |
| 10. | सोलापूर | अ. कोळी महादेव डोंगर कोळी | 12662 | 11760 | 24422 | 56 | 85 | 70 | 44 | 15 | 30 |
| 11. | कोल्हापूर | अ. कोळी महादेव डोंगर कोळी | 6745 | 6401 | 13146 | 39 | 73 | 56 | 61 | 33 | 49 |
| 12. | औरंगाबाद | अ. भिल, भिल गरासिया ढेली भिल | 17881 | 17710 | 35591 | 81 | 98 | 89 | 19 | 02 | 11 |
| | | ब. कोळी मल्हार | 6702 | 6581 | 13283 | 69 | 96 | 82 | 31 | 04 | 18 |

| अ. क्र. | जिल्हा | जमातीचे नांव | एकूण लोकसंख्या (1981 च्या जनगणनेनुसार) | | | निरक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | | साक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| 13. | परभणी | अ. आंध | 28839 | 28100 | 56939 | 75 | 76 | 75 | 25 | 24 | 25 |
| 14. | नांदेड | अ. आंध | 20554 | 19854 | 40408 | 70 | 35 | 82 | 30 | 05 | 18 |
| | | ब. गोंड, राजगोंड, अरख | 10714 | 10942 | 21656 | 69 | 93 | 82 | 31 | 07 | 18 |
| | | क. कोलम, मन्नेरवारलू | 14150 | 13946 | 28096 | 60 | 90 | 75 | 40 | 10 | 25 |
| | | ड. कोळी महादेव, डोंगर कोळी | 15335 | 14803 | 30138 | 72 | 96 | 84 | 28 | 04 | 16 |
| | | इ. ओरान, धनगड | 11114 | 10629 | 21743 | 66 | 93 | 79 | 34 | 07 | 21 |
| 15. | उस्मानाबाद | अ. कोळी महादेव डोंगर कोळी | 13704 | 13197 | 26901 | 65 | 91 | 78 | 35 | 09 | 22 |
| 16. | बुलढाणा | अ. कोळी महादेव डोंगर कोळी | 7983 | 7690 | 15673 | 53 | 88 | 70 | 47 | 12 | 30 |
| 17. | अकोला | अ. आंध | 21904 | 21731 | 43635 | 65 | 92 | 78 | 35 | 08 | 22 |
| | | ब. धनवार | 6305 | 5864 | 12169 | 43 | 65 | 53 | 57 | 35 | 47 |
| | | क. कोळी महादेव, डोंगर कोळी | 8404 | 8114 | 16518 | 41 | 69 | 55 | 59 | 31 | 45 |
| | | ड. पारधी, अडवी चिंचेर | 5435 | 5189 | 10624 | 62 | 86 | 74 | 38 | 14 | 26 |

| अ.क्र. | जिल्हा | जमातीचे नांव | एकूण लोकसंख्या (1981 च्या जनगणनेनुसार) | | | निरक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | | साक्षरतेचे टक्केवारीमध्ये प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण |
| 18. | अमरावती | अ. गोंड, राजगोंड, अरख | 31013 | 29399 | 60412 | 57 | 84 | 75 | 33 | 16 | 25 |
| | | ब. धनवार | 7529 | 7055 | 14584 | 36 | 53 | 44 | 64 | 47 | 56 |
| | | क. कोरकू, वोपची, मोसी | 53612 | 52501 | 106113 | 80 | 96 | 88 | 20 | 04 | 12 |
| | | ड. पारधी, अडवीचिंचेर | 6720 | 6212 | 12932 | 62 | 84 | 73 | 38 | 16 | 27 |
| 19. | वर्धा | अ. गोंड, राजगोंड, अरख | 43320 | 41912 | 85232 | 60 | 82 | 71 | 40 | 18 | 29 |
| 20. | नागपूर | अ. गोंड, राजगोंड, अरख | 66077 | 62625 | 128702 | 64 | 86 | 75 | 36 | 14 | 25 |
| | | ब. हलबा, हलबी | 8377 | 8115 | 16492 | 31 | 60 | 45 | 69 | 40 | 55 |
| 21. | भंडारा | अ. गोंड, राजगोंड, अरख | 90371 | 91896 | 182267 | 57 | 87 | 72 | 43 | 13 | 28 |
| | | ब. हलबा, हलबी | 26728 | 27019 | 53747 | 43 | 78 | 61 | 57 | 22 | 39 |
| 22. | चंद्रपूर | अ. गोंड, राजगोंड, अरख | 214480 | 212521 | 427001 | 71 | 91 | 81 | 29 | 09 | 19 |
| | | ब. हलबा, हलबी | 7594 | 7667 | 15261 | 39 | 70 | 55 | 61 | 30 | 45 |
| | | क. प्रधान, पाथेरी, सारोटी | 20182 | 20049 | 40231 | 54 | 84 | 69 | 46 | 16 | 31 |

सर्व्हेक्षणासाठी माहिती मागविताना ज्या जिल्हयांमध्ये आश्रमशाळा आहेत अशा 23 जिल्हयातील एकूण 347 आश्रमशाळांपैकी 60 आश्रमशाळांची माहिती मागविण्यात आली. प्रत्येक जिल्हयातून कमीत कमी 1 आश्रमशाळा सर्व्हेक्षणासाठी निवडण्यात आली व जास्तीत जास्त 4 आश्रमशाळांचा समावेश करण्यात आला. एकूण 60 आश्रमशाळांची सर्व्हेक्षणासाठी निवड करण्यात आली. पैकी नाशिक व यवतमाळ जिल्हयाची माहिती वारंवार मागणी करून हाती येऊ शकली नाही. उर्वरित 21 जिल्हयांमधून 50 आश्रमशाळांनी विशिष्ट प्रपत्रात माहिती भरून पाठविली आहे.

उपरोक्त तक्त्यावरून सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या शाळांमधून प्राप्त झालेल्या माहितीनुसार 50 आश्रमशाळांमधून 15,199 विद्यार्थी सन 1990-91 या वर्षामध्ये शिक्षण घेत असल्याचे आढळले. तसेच उपलब्ध झालेल्या माहितीनुसार 50 आश्रमशाळांपैकी 31 आश्रमशाळांमध्ये इ.7 वी पर्यंत शिक्षण दिले जाते तर 19 शाळांमध्ये इ.10 वी पर्यंत शिक्षण दिले जाते. इ.1 ते 7 वी पर्यंत शिक्षण देणा-या प्राथमिक शाळांना बेसिक आश्रमशाळा असे संबोधले जाते. अशा शाळेमधील शिक्षकांची संख्या 329 असल्याचे आढळून आले. तर 1 ली ते 10 वी पर्यंत शिक्षण देणा-या आश्रमशाळांना पोस्टबेसिक आश्रमशाळा म्हणून संबोधिले आहे. अशा आश्रमशाळेतील शिक्षकांची संख्या 106 असल्याचे आढळून आले.

आश्रमशाळेची इमारत व वसतीगृहाची इमारत विद्यार्थ्यांना पुरेशी आहे का ? याची माहिती घेतली असता पुढील बाबी निदर्शनास आलेल्या आहेत.

## तक्ता क्र.3.2

### आश्रमशाळांची जिल्हानिहाय प्रस्ताविक माहिती दर्शविणारा तक्ता

| अ. क्र. | जिल्हा | एकूण आश्रम शाळांची संख्या (89-90 अखेर) | सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या | माहिती प्राप्त झालेल्या आश्रमशाळांची संख्या | माहिती प्राप्त न झालेल्या आश्रमशाळांची संख्या | एकूण आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या | सर्व्हेक्षणात निवडलेल्या आश्रमशाळा विद्यार्थ्यांची संख्या | एकूण आश्रमशाळा: इ.7 वी पर्यंत | एकूण आश्रमशाळा: इ.10 वी पर्यंत | माहिती प्राप्त झालेल्या आश्रमशाळेतील शिक्षक संख्या: प्राथमिक पर्यंत | माहिती प्राप्त झालेल्या आश्रमशाळेतील शिक्षक संख्या: माध्यमिक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. | .9. | .10. | .11. | .12. |
| | | | | | | **सह्याद्री विभाग** | | | | | |
| 1. | ठाणे | 64 | 3 | 3 | - | 16217 | 826 | 2 | 1 | 20 | 8 |
| 2. | रायगड | 08 | 4 | 4 | - | 1925 | 1243 | 3 | 1 | 26 | 5 |
| 3. | रत्नागिरी | 02 | 1 | 1 | - | 413 | 235 | 1 | - | 09 | - |
| 4. | धुळे | 65 | 3 | 3 | - | 18103 | 1034 | 2 | 1 | 27 | 5 |
| 5. | पुणे | 14 | 4 | 4 | - | 3309 | 989 | 2 | 2 | 19 | 11 |
| 6. | कोल्हापूर | 02 | 2 | 2 | - | 251 | 556 | 1 | 1 | 06 | 9 |
| 7. | सातारा | 02 | 1 | 1 | - | 200 | 85 | 1 | - | 10 | -- |
| 8. | सोलापूर | 02 | 1 | 1 | - | 145 | 189 | 1 | - | 07 | -- |
| 9. | अहमदनगर | 15 | 4 | 4 | - | 4314 | 1403 | 2 | 2 | 25 | 8 |
| 10. | जळगांव | 14 | 4 | 4 | - | 3110 | 1497 | 2 | 2 | 34 | 13 |
| 11. | औरंगाबाद | 04 | 2 | 2 | - | 1003 | 693 | 1 | 1 | 21 | 5 |
| 12. | बीड | 02 | 1 | 1 | - | 350 | 311 | 1 | - | 09 | - |

| अ. क्र. | जिल्हा | एकूण आश्रम शाळांची संख्या (89-90 अखेर) | सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या आश्रमशाळांची संख्या | माहिती प्राप्त झालेल्या आश्रमशाळांची संख्या | माहिती प्राप्त न झालेल्या आश्रमशाळांची संख्या | एकूण आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या | सर्व्हेक्षणात निवडलेल्या आश्रमशाळा विद्यार्थ्यांची संख्या | एकूण आश्रमशाळा इ.7 वी पर्यंत | इ.10 वी पर्यंत | माहिती प्राप्त झालेल्या आश्रमशाळेतील शिक्षक संख्या प्राथमिक पर्यंत | माध्यमिक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| .1. | .2. | .3. | .4. | .5. | .6. | .7. | .8. | .9. | .10. | .11. | .12. |
| | | | | | | गोंडवन विभाग | | | | | |
| 13. | नागपूर | 06 | 1 | 1 | - | 1317 | 132 | 1 | - | 10 | - |
| 14. | वर्धा | 05 | 1 | 1 | - | 1261 | 199 | 1 | - | 12 | - |
| 15. | अमरावती | 16 | 3 | 1 | 2 | 4438 | 226 | 1 | - | 11 | - |
| 16. | अकोला | 02 | 2 | 2 | - | 706 | 744 | 1 | 1 | 16 | 5 |
| 17. | नांदेड | 12 | 4 | 4 | - | 3761 | 1418 | 2 | 2 | 22 | 16 |
| 18. | परभणी | 04 | 2 | 2 | - | 1225 | 537 | 1 | 1 | 12 | 10 |
| 19. | भंडारा | 12 | 4 | 4 | - | 2770 | 1382 | 2 | 2 | 24 | 11 |
| 20. | चंद्रपूर | 12 | 3 | 3 | - | 2649 | 949 | 2 | 1 | - | - |
| 21. | गडचिरोली | 35 | 2 | 2 | - | 9163 | 551 | 1 | 1 | 9 | माहिती अप्राप्त |
| | एकूण | 228 | 52 | 50 | 2 | 76630 | 15199 | 31 | 19 | 329 | 106 |

3.3 1. सदर तक्त्यावरुन माहिती मागविलेल्या सर्व (100 टक्के) आश्रमशाळा या गांवापासून 5 कि.मी.अंतराच्या आत असल्याचे आढळून आले.

2. 36 टक्के आश्रमशाळा कच्च्या इमारतीमध्ये 60 टक्के आश्रमशाळा पक्क्या इमारतीमध्ये भरत असल्याचे आढळून आले.

3. 10 टक्के आश्रमशाळा या भाडयाच्या जागेत तर 78 टक्के आश्रमशाळा स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्ये भरत असल्याचे आढळून आले.

4. सर्व्हेक्षण पाहणीमध्ये माहिती मागविलेल्या आश्रमशाळांपैकी 2391 विद्यार्थ्यांना अद्यापही आश्रमशाळेची इमारत अपूरी पडते यासाठी एकूण 97 खोल्यांची आवश्यकता असल्याचे आढळून आले.

5. सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या आश्रमशाळेत विद्यार्थ्यांची संख्या 15,199 इतकी असल्याचे आढळून आले. त्यापैकी 11,591 विद्यार्थी निवासी विद्यार्थी असल्याचे दिसून आले.

6. 1991 मध्ये सर्व्हेक्षणासाठी निवडलेल्या शाळांमध्ये 320 शिक्षक अद्यापनाचे कार्य करीत आहेत. तथापि, 217 शिक्षकांना निवासव्यवस्था उपलब्ध आहे तर 152 चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांकरिता निवासव्यवस्था असल्याचे आढळून आले. यामध्ये कामाठी व वॉचमन यांचा समावेश आहे.

3.4 बेसिक आश्रमशाळेतील शिक्षकांचे वर्गीकरण (1988 ते 1991)

बेसिक आश्रमशाळेतील शिक्षकांचे शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण खालील तक्त्यात दिलेले आहे.

## तक्ता क्र. 3.3

### आश्रमशाळेची इमारत व वसतीगृहाबाबत

| अ. क्र. | विभाग | आश्रमशाळेचे गांवापासून अंतर | | | आश्रमशाळा इमारत प्रकार | | | | किती विद्यार्थ्यांना पुरते | | खोल्यांची आवश्यकता | निवास व्यवस्था | | प्रत्यक्ष मुक्कामास असणा-या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 5 कि. मी. | 10 कि. मी. | 10 कि. मी. पेक्षा पुढे | कच्ची | पक्की | भाड्याची | मालकी | पुरणा-या विद्यार्थ्यांची | अपू-या विद्यार्थी | | शिक्षक निवास | वर्ग-4 कर्मचा-यांसाठी | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 1. | सह्याद्री | 30 | - | - | 11 | 17 | 07 | 22 | 2268 | 1480 | 67 | 128 | 100 | 6977 |
| 2. | गोंडवन | 20 | - | - | 07 | 13 | 03 | 17 | 2063 | 911 | 30 | 89 | 52 | 4614 |
| | एकूण | 50 | - | - | 18 | 30 | 10 | 39 | 4331 | 2391 | 97 | 217 | 152 | 11591 |

तक्ता क्र·३·४

बेसिक आश्रमशाळेतील शिक्षकांचे शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण

| अ·क्र· | आश्रमशाळा | साल | उपलब्ध आश्रम शाळांची संख्या | शैक्षणिक पात्रता | | | शिक्षक संख्या | | | शिकविण्याचा विषय | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एस·एस·सी | बी·ए·/ बी·कॉम· बी·एस्सी· | एम·ए·/ एम·कॉम· एम·एस्सी· | प्रशिक्षित | अप्रशिक्षित | एकूण | सर्व | इंग्रजी |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1· | सह्याद्री | 1988 | 27 | 160 | 39 | 6 | 187 | 17 | 205 | 187 | 13 |
| | गोंडवन | | 13 | 90 | 15 | 2 | 107 | 3 | 107 | 99 | 08 |
| | एकूण | | 40 | 250 | 54 | 8 | 291 | 20 | 312 | 286 | 21 |
| 2· | सह्याद्री | 1989 | 27 | 155 | 45 | 6 | 188 | 18 | 206 | 193 | 11 |
| | गोंडवन | | 13 | 94 | 14 | 2 | 106 | 4 | 110 | 100 | 10 |
| | एकूण | | 40 | 249 | 59 | 8 | 294 | 22 | 316 | 293 | 21 |
| 3· | सह्याद्री | 1990 | 27 | 149 | 54 | 7 | 192 | 19 | 211 | 199 | 10 |
| | गोंडवन | | 13 | 100 | 14 | 2 | 112 | 4 | 116 | 106 | 9 |
| | एकूण | | 40 | 249 | 68 | 9 | 304 | 23 | 327 | 305 | 19 |
| 4· | सह्याद्री | 1991 | 27 | 146 | 56 | 5 | 191 | 16 | 207 | 197 | 10 |
| | गोंडवन | | 13 | 97 | 12 | 4 | 109 | 4 | 113 | 102 | 11 |
| | एकूण | | 40 | 243 | 68 | 9 | 300 | 20 | 320 | 299 | 21 |

1. उपरोक्त तक्त्यावरुन 1988 ते 1991 या चार वर्षामध्ये शिक्षकांची संख्या प्रतिवर्षी सरासरी 318 च्या आसपास असल्याचे आढळून आले. शिक्षकांच्या संख्येमध्ये वाढ/घट झाल्याचे आढळून आले नाही

2. 1988 मध्ये दोन्ही विभाग मिळून 291 शिक्षक प्रशिक्षित होते. ते प्रमाण वाढून 1991 पर्यंत 300 शिक्षक प्रशिक्षित झाल्याचे आढळून आले. म्हणजेच 4 वर्षात फक्त 9 शिक्षक प्रशिक्षित झाले.

3. सन 1991 मध्ये बेसिक आश्रमशाळेतील 68 (28 टक्के) शिक्षक पदवीधर व 9 (4 टक्के) शिक्षक पदव्युत्तर शिक्षण घेतल्याचे आढळून आले.

4. प्रशिक्षित शिक्षकांच्या तुलनेत अप्रशिक्षित शिक्षकांचे प्रमाण सन 1991 मध्ये अल्प (7 टक्के) असल्याचे आढळून आले.

5. माहिती उपलब्ध झालेल्या 50 आश्रमशाळांपैकी 1988 मध्ये 21 (42 टक्के) आश्रमशाळांमध्ये दरवर्षी इंग्रजी या विषयासाठी स्वतंत्र शिक्षक होते. बाकी विषयासाठी स्वतंत्र शिक्षकांची नेमणूक केली नव्हती. प्रत्येक शिक्षक सर्व विषय तर काही शिक्षक इंग्रजीसह सर्व विषय शिकवित असल्याचे आढळून आले. 1989 मध्ये व 1991 मध्ये 42 टक्के आश्रमशाळांमध्ये इंग्रजी या विषयासाठी स्वतंत्र शिक्षक असल्याचे आढळून आले. 1990 मध्ये इंग्रजी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचे प्रमाण 38 टक्के पर्यंत खाली आल्याचे दिसून आले.

3.5 1. निवडलेल्या 50 आश्रमशाळांमधून 1988 ते 1991 पर्यंतची माहिती सरासरी 17 पोस्टबेसिक आश्रमशाळांनी पाठविली आहे.

2. पोस्टबेसिक आश्रमशाळेतील शिक्षकांची पदे 1988 मध्ये दोन्ही विभाग मिळून 80 होती. 1989 मध्ये त्यात वाढ होऊन 92 झाली. 1990 मध्ये शिक्षक संख्येत वाढ होऊन ती संख्या 103 वर गेली. 1991 मध्ये शिक्षक संख्येत परत घट झाल्याचे आढळून आले. विशिष्ट जमातीसाठी राखून ठेवलेल्या व सोडून गेलेल्या शिक्षक संख्येत वाढ होत असल्याचे आढळून आले. शिक्षकांची पदे शक्यतो रिक्त ठेवू नयेत कारण त्याचा परिणाम अध्यापनावर होतो.

3. पोस्टबेसिक आश्रमशाळेतील पदवीधर शिक्षकांचे प्रमाण सरासरी 30 असल्याचे आढळून येते. पदव्युत्तर शिक्षण घेतलेले प्रतिवर्षी सरासरी 62 टक्के शिक्षक आढळून आले. यामध्ये एम.कॉम., एम.एस्सी., एम.ए. व एम.एस.डब्ल्यू.इ.पदवीचे शिक्षण घेतलेले आढळले.

4. वरील माहिती मागविताना मंजूर व रिक्त पदांची माहिती मागविण्यात आली होती. परंतु कोणत्याही आश्रमशाळेने वरील रकाना भरला नसल्याचे आढळून आले. बहुतेक सर्व शाळांमध्ये तासवारी पद्धतीने अभ्यासक्रम शिकविला जात असल्याचे आढळून आले. हिंदी, इंग्रजी, गणित, शास्त्र, मराठी, समाज शास्त्र यापैकी एका शिक्षकाकडे दोन विषय शिकविण्यासाठी देण्यात आल्याचे दिसून येते.

5. 1988 मध्ये अर्थशास्त्र विषय, शिकविणाऱ्या 3 आश्रमशाळा आढळून आल्या. 1990 मध्ये त्यात वाढ होऊन 18 आश्रमशाळांमध्ये हा विषय शिकविला गेला. तर 1991 मध्ये या संख्येत घट होऊन फक्त 5 आश्रमशाळांमध्ये अर्थशास्त्र हा विषय शिकविला गेला.

## आश्रमशाळेतील गळतीची कारणमिमांसा व वर्गीकरण

आदिवासी समाजातील शैक्षणिक प्रगती व शैक्षणिक प्रगती करीत असताना होणारी गळती यांचा अभ्यास करतांना उपयोजना क्षेत्रातील व उपयोजना क्षेत्राबाहेरील 23 जिल्ह्यांमधून 50 आश्रमशाळांची निवड करण्यात आली. प्रत्येक जिल्ह्यातील आश्रमशाळांच्या गळतीचे प्रमाण वेगवेगळे आहे व गळतीची कारणेही भिन्न आहेत. पुढील तक्त्यावरून याची कल्पना येते.

## तक्ता क्र.3.5

### पोस्टबेसिक आश्रमशाळेतील शिक्षकांचे शैक्षणिक पात्रता व शिकविण्याच्या विषयानुसार वर्गीकरण

| अ. | आश्रम शाळा | साल | उपलब्ध पोस्ट बेसिक आश्रम शाळांची संख्या | शिक्षकांची भरलेली पदे/ शिक्षक संख्या | शैक्षणिक पात्रता | | | | प्रत्यक्ष शिकविण्याचा विषय | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | पदवीधर | पदव्युत्तर | प्रशिक्षित | अप्रशिक्षित | हिंदी | इंग्रजी | मराठी | शास्त्र | गणित | अर्थशास्त्र | समाजशास्त्र |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 1. | सह्याद्री<br>गोंडवन | 1988 | 12<br>05 | 55<br>25 | 23<br>07 | 32<br>18 | 45<br>23 | 10<br>02 | 11<br>04 | 11<br>05 | 11<br>05 | 10<br>05 | 09<br>04 | 02<br>01 | 11<br>05 |
| | एकूण | | 17 | 80 | 30 | 50 | 68 | 12 | 15 | 16 | 16 | 15 | 13 | 03 | 16 |
| 2. | सह्याद्री<br>गोंडवन | 1989 | 11<br>06 | 61<br>31 | 18<br>08 | 43<br>23 | 47<br>30 | 14<br>01 | 11<br>05 | 11<br>05 | 11<br>06 | 11<br>06 | 11<br>07 | 07<br>06 | 04<br>-- |
| | एकूण | | 17 | 92 | 26 | 66 | 77 | 15 | 16 | 16 | 16 | 16 | 18 | 13 | 04 |
| 3. | सह्याद्री<br>गोंडवन | 1990 | 10<br>08 | 61<br>42 | 20<br>16 | 41<br>26 | 55<br>40 | 08<br>42 | 10<br>08 | 11<br>08 | 10<br>08 | 10<br>07 | 10<br>07 | 10<br>08 | 08<br>04 |
| | एकूण | | 18 | 103 | 36 | 67 | 95 | 50 | 18 | 18 | 18 | 17 | 17 | 18 | 12 |
| 4. | सह्याद्री<br>गोंडवन | 1991 | 11<br>06 | 66<br>30 | 21<br>08 | 47<br>22 | 60<br>29 | 08<br>01 | 11<br>06 | 11<br>06 | 11<br>06 | 11<br>06 | 11<br>05 | 02<br>03 | 10<br>07 |
| | एकूण | | 17 | 96 | 29 | 67 | 89 | 09 | 17 | 17 | 17 | 17 | 16 | 05 | 17 |

## तक्ता क्र•3•6

### आश्रमशाळेतील गळतीची कारणमिमांसा व वर्गीकरण

| अ•क्र | जिल्हा | माहिती उपलब्ध झालेल्या आश्रम शाळांची संख्या | बक्षिसाचे स्वरुप | | | गळतीचे प्रमाण | | गळतीची कारणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तु | रक्कम | प्रशस्तीपत्रक | प्राथमिक टक्के | माध्यमिक टक्के | कौटुंबिक | आर्थिक | सामाजिक | इतर (आजारपण) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | सह्याद्री विभाग | | | | | | | | | | |
| 1 | नाशिक | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 2• | ठाणे | 3 | 2 | 1 | - | 70 | 35 | 3 | 3 | 2 | - |
| 3• | रायगड | 4 | 2 | 1 | - | 35 | 12 | 4 | 4 | 3 | - |
| 4• | रत्नागिरी | 1 | 1 | 1 | 1 | -- | -- | 1 | 1 | 1 | - |
| 5• | धुळे | 3 | 2 | - | - | 15 | 08 | 3 | - | 3 | - |
| 6• | पुणे | 4 | 1 | - | - | 70 | 45 | 3 | 3 | 3 | 1 |
| 7• | कोल्हापूर | 2 | 2 | - | - | 39•7 | 31 | 2 | 2 | 1 | - |
| 8• | सातारा | 1 | 1 | - | - | 10 | -- | 1 | 1 | 1 | - |
| 9• | सोलापूर | 1 | 1 | - | - | 10 | -- | 1 | 1 | 1 | - |
| 10• | अहमदनगर | 4 | 2 | 1 | 1 | 22 | 35 | 3 | 4 | - | 1 |
| 11• | जळगांव | 4 | 1 | 1 | - | 60 | 48 | 3 | 4 | 2 | 4 |
| 12• | औरंगाबाद | 2 | 2 | 1 | - | 14 | 05 | 2 | 2 | 2 | 1 |
| 13• | बीड | 1 | 1 | 1 | - | 10 | - | 1 | 1 | - | - |
| | एकूण | 30 | 18 | 7 | 2 | - | - | 27 | 26 | 19 | 7 |
| | टक्केवारी | - | 60 | 23 | 7 | - | - | 90 | 86 | 63 | 23 |

| अ.क्र | जिल्हा | माहिती उपलब्ध झालेल्या आश्रम शाळांची संख्या | बक्षिसाचे स्वरूप | | | गळतीचे प्रमाण | | गळतीची कारणे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | वस्तु | रक्कम | प्रशस्तीपत्रक | प्राथमिक टक्के | माध्यमिक टक्के | कौटुंबिक | आर्थिक | सामाजिक | इतर (आजारपण) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | | गोंडवन विभाग | | | | | |
| 14. | नागपूर | 1 | 1 | - | - | 66 | - | 1 | 1 | 1 | - |
| 15. | वर्धा | 1 | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 16. | अमरावती | 1 | 1 | - | 1 | 20 | - | 1 | 1 | 1 | 1 |
| 17. | अकोला | 2 | 2 | - | - | 90 | 48 | 2 | 2 | 2 | - |
| 18. | यवतमाळ | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| 19. | नांदेड | 4 | 3 | - | 1 | 37 | 18 | 3 | 3 | 3 | 3 |
| 20. | परभणी | 2 | 2 | - | - | 10 | 15 | 1 | 1 | - | - |
| 21. | भंडारा | 4 | 4 | 1 | - | 20 | 12.5 | 4 | 2 | 3 | 1 |
| 22. | चंद्रपूर | 3 | 3 | - | - | 28 | 08 | 3 | 2 | 3 | 2 |
| 23. | गडचिरोली | 2 | - | 1 | - | 12 | 04 | 2 | 2 | 2 | 2 |
| | एकूण | 20 | 16 | 2 | 2 | - | - | 17 | 14 | 15 | 9 |
| | टक्केवारी | - | 80 | 10 | 10 | 35.37 | 17.58 | 85 | 70 | 75 | 45 |
| | सह्याद्री | 30 | 18 | 7 | 2 | - | - | 27 | 26 | 19 | 07 |
| | गोंडवन | 20 | 16 | 2 | 2 | - | - | 17 | 14 | 15 | 09 |
| | एकूण | 50 | 34 | 9 | 4 | - | - | 44 | 40 | 34 | 16 |
| | टक्केवारी | - | 68 | 18 | 08 | - | - | 88 | 80 | 68 | 32 |

3.6 1. वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, 34 शाळांमधून विद्यार्थ्यांना वस्तु स्वरुपात बक्षिसाचे प्रलोभन दिले जाते.

2. तसेच 9 आश्रमशाळांमध्ये रोख रकमेच्या स्वरुपात विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे वाटली जातात. यामध्ये सह्याद्री विभागात रोख रकमेच्या स्वरुपात मिळणा-या बक्षिसांचे प्रमाण अधिक आहे.

3. प्रशस्तीपत्रकाच्या स्वरुपात दिली जाणारी बक्षिसे अहमदनगर, रत्नागिरी, अमरावती व नांदेड या चार जिल्हयांमधील आश्रमशाळांमधून वाटल्याचे दिसून आले. जे विद्यार्थी अभ्यासात उत्कृष्ट गुण मिळवून प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवतात त्यांनाच वस्तु स्वरुपात प्रशस्तीपत्रक व रोख रकमेच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात.

प्राथमिक शाळेतील गळती :-

4. गळतीचे प्रमाण प्रत्येक जिल्हयात वेगवेगळे असल्याचे आढळून आले. याची कारणे काय असावीत हे स्थानिक परिस्थितीवर बरेचसे अवलंबून आहे. प्राथमिक शाळेत 70 टक्केच्या वर गळती झालेली सह्याद्री विभागातील ठाणे व पुणे हे दोन जिल्हे आढळून आले. 60 टक्केच्या वर विद्यार्थ्यांची गळती झालेला जळगांव हा एकमेव जिल्हा आढळून आला. 35 टक्केच्यावर प्राथमिक शाळेत गळती झालेले रायगड व कोल्हापूर हे दोन जिल्हे आहेत. उर्वरित जिल्हयांमध्ये 10 टक्के ते 25 टक्केच्या दरम्यान गळती झाल्याचे आढळून आले.

गोंडवन विभागात अकोला जिल्हयात 90 टक्केच्यावर, नागपूर जिल्हयात 60 टक्केच्यावर व नांदेड जिल्हयातील प्राथमिक विभागातील गळती 35 टक्केच्यावर असल्याचे आढळून आले. अमरावती, परभणी व भंडारा या जिल्हयांमध्ये प्राथमिक विभागातील गळतीचे प्रमाण 10 ते 25 टक्के होते.

माध्यमिक शाळेतील गळती :-

5. सह्याद्री विभागात माध्यमिक शाळेत 45 ते 50 टक्केच्या वर गळती झालेले पुणे व जळगांव हे दोन जिल्हे आढळून आले. 30 ते 35 टक्के गळती झालेले ठाणे, कोल्हापूर, अहमदनगर हे तीन जिल्हे आढळून आले. धुळे, रायगड, औरंगाबाद या जिल्हयांमध्ये 5 ते 15 टक्के गळती असल्याचे आढळून आले.

गोंडवन विभागात अकोला जिल्हयात माध्यमिक शाळेत 48 टक्के गळती झाल्याचे आढळून आले. उरलेल्या जिल्हयांमध्ये 4 टक्के ते 20 टक्के गळती झाल्याचे निदर्शनास आले .

6. वरील तक्त्यावरून असे स्पष्ट दिसते की,प्राथमिक व माध्यमिक शाळांमध्ये सर्वाधिक गळती झालेले ठाणे, पुणे, जळगांव, नागपूर अकोला हे पाच जिल्हे आढळून आले.

तक्ता क्र. 5.7

आश्रमशाळेतील सुविधा व इतर सोईचे वर्गीकरण

| अ. क्र. | विभाग | आश्रमशाळेतील सोई व भौतिक सुविधा | | | | | सोयती उपलब्ध आश्रमशाळा | आश्रमशाळेचे अंतर | | | | | | वर्षातून शारिरीक तपासणी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | प्राथमिक आरोग्य केंद्रापासून | | | उपकेंद्रापासून | | | | | |
| | | चार माळी फर्मा | दळण वळण | दवाखाने | लाईट | दुकान | | 0 ते 5 कि.मी. | 5 ते 10 कि.मी. | 10 च्या पुढे | 0 ते 5 कि.मी. | 5 ते 10 कि.मी. | 10 च्या पुढे | एक वेळा | दोन वेळा | तीन वेळा |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 |
| 1. | सह्याद्री | 19 | 17 | 19 | 25 | 14 | 34 | 11 | 7 | 10 | 2 | - | 1 | 6 | 21 | 2 |
| 2. | गोंडवन | 12 | 9 | 10 | 6 | 6 | 26 | 9 | 4 | 5 | 2 | - | - | 7 | 1 | - |
| | एकूण | 31 | 26 | 29 | 31 | 20 | 50 | 20 | 11 | 15 | 4 | - | 1 | 13 | 22 | 2 |
| | टक्केवारी | 62 | 52 | 58 | 62 | 40 | 100 | 40 | 22 | 30 | 8 | - | 2 | 26 | 44 | 4 |

## 3.7 आश्रमशाळेतील सुविधा व इतर सोयींचे वर्गीकरण :-

1. उपरोक्त तक्त्यावरुन उपलब्ध 50 आश्रमशाळांच्या माहितीवरुन 62 टक्के आश्रमशाळांना बारमाही पिण्याचे पाणी उपलब्ध आहे. उर्वरित 38 टक्के आश्रमशाळांना उन्हाळयात पाण्याचा तुटवडा भासतो. काही शाळांना लांबून कावडीने पाणी पुरवठा करावा लागतो.

2. 52 टक्के आश्रमशाळांना दळणवळणाची सोय उपलब्ध आहे. 48 टक्के आश्रमशाळांना रस्त्यांच्या दुरावस्थेमुळे पावसाळयात वाहतूक व्यवस्था बंद पडल्यामुळे दळणवळण बंद पडते.

3. तर 58 टक्के आश्रमशाळांना दवाखाने, आरोग्य केंद्र यांची सोय उपलब्ध आहे. उर्वरित आश्रमशाळांपैकी काही आश्रमशाळेच्या आसपास दवाखाना नाही. तर काही ठिकाणी खूप अंतरावर दवाखाने आहेत. परंतू वाहतूकीची सोय नाही.

4. 62 टक्के आश्रमशाळांच्या ठिकाणी लाईटची सोय असल्याचे आढळून आले. काही ठिकाणी वायरिंग नादुरुस्तीमुळे लाईट नाहीत तर काही ठिकाणी अद्याप लाईट आलेली नाही.

5. आश्रमशाळा ज्या गांवात आहेत, अशा 40 टक्के गांवामध्ये जीवनावश्यक वस्तू मिळण्याची दुकाने आहे. तर बाकीच्या ठिकाणी तालुक्याच्या ठिकाणी जीवनावश्यक वस्तूच्या खरेदीसाठी दूर जावे लागत असल्याचे आढळून आले.

6. 40 टक्के आश्रमशाळां या प्राथमिक आरोग्य केंद्रापासून 5 कि.मी.अंतरावर आहेत. 22 टक्के आश्रमशाळा या 5 ते 10 कि.मी.अंतरावर आहेत. तर 30 टक्के आश्रमशाळा या प्राथमिक आरोग्य केंद्रापासून 10 कि.मी.च्या पुढे आहेत. 8 टक्के आश्रमशाळांचे आरोग्य केंद्रापासूनचे अंतर माहिती नसल्यामुळे देता आले नाही.

7. आश्रमशाळेचे उपकेंद्रापासूनचे अंतरासंबंधीची माहिती फक्त 5 आश्रमशाळांनी §10 टक्के§ दिली आहे. त्यात 2 टक्के आश्रमशाळा या 10 कि.मी. च्या पुढे आहेत. तर 8 टक्के आश्रमशाळा या 5 कि.मी.च्या आतल्या आहेत.

3.8 अध्यापन व परीक्षा पध्दतीचे वर्गीकरण :

1. वरील तक्त्यावरुन निवडलेल्या सर्व आश्रमशाळांमध्ये (100 टक्के) घटक नियोजन व वार्षिक नियोजन असल्याचे आढळून आले.

2. सह्याद्री व गोंडवन या दोन विभागात मिळून 80 टक्के आश्रमशाळांमध्ये व्याख्यान पध्दतीने अध्यापन करीत असल्याचे आढळून आले. 86 टक्के आश्रमशाळांमध्ये प्रश्नोत्तर पध्दती, तर 66 टक्के आश्रमशाळांमध्ये चर्चा पध्दतीने अभ्यासक्रम शिकवित असल्याचे आढळून आले. वरील टक्केवारीवरुन असे दिसून येते की, आश्रमशाळांमध्ये एका वेळेला दोन अध्यापन पध्दतीने अध्यापन केले जाते. उदा.प्रश्नोत्तर पध्दती व चर्चा पध्दती, व्याख्यान पध्दती व प्रश्नोत्तर पध्दती.

3. प्रश्नोत्तर पध्दतीने अध्यापन करण्याचे प्रमाण (86 टक्के) सर्वाधिक असल्याचे आढळून आले. त्यानंतर व्याख्यान पध्दतीने शिकविले जाते ते प्रमाण 80 टक्के आढळून आले.

4. वरील सर्व विवेचनावरुन असे स्पष्ट होते की, प्रश्नोत्तर पध्दती इतर पध्दतीपेक्षा अधिक प्रभावी असल्याने परिणामकारक अध्यापन पध्दती म्हणून 72 टक्के आश्रमशाळांमधून या पध्दतीचा वापर केला जातो.

5. प्रश्नोत्तर पध्दतीनंतर व्याख्यान पध्दती अध्यापन करण्याच्या दृष्टीने अधिक परिणामकारक असल्याने या पध्दतीची टक्केवारी 60 टक्के असल्याचे आढळून आले.

6. चर्चा पध्दतीने 66 टक्के आश्रमशाळेमध्ये अध्यापन केले जाते. तर 30 टक्के आश्रमशाळांना चर्चा पध्दती परिणामकारक अध्यापन पध्दती असल्याचे आढळून आले.

7. मागे असणा-या विद्यार्थ्यांसाठी कोणकोणत्या विषयासाठी जास्तीचे वर्ग किंवा जादा क्लासेस काढले जातात हे पाहिले असता खालील निष्कर्ष हाती आले. 32 टक्के शाळांमधून "मराठी" या विषयासाठी जादा क्लासेस किंवा जास्तीचे वर्ग घेतले जातात. 92 टक्के शाळांमधून "इंग्रजी" या विषयासाठी जादाचे वर्ग चालविले जातात. तर 96 टक्के आश्रमशाळांमधून "गणित" या विषयासाठी जादा क्लासेस घेतले जात असल्याचे आढळून आले. यावरुन इंग्रजी व गणित हे महत्वाचे विषय व काही आश्रमशाळांमधून मराठी हा विषय विद्यार्थ्यांना आकलन होण्यास अवघड जात असल्याचे दिसून येते.

8. गणित विषयासाठी जादा क्लासेस घेतले जात असल्याचे प्रमाण सर्वाधिक (96 टक्के) आढळून आले. त्या खालोखाल इंग्रजी या विषयासाठी जादा क्लासेस घेतले जात असल्याचे आढळून आले.

तक्ता क्र.3.8

अध्यापन व परीक्षा पध्दतीचे वर्गीकरण

| अ.क्र. | विभाग | वार्षिक परीक्षा नियोजन | | अध्यापन पध्दती | | | परिणामकारक अध्यापन पध्दती | | | मागे असणा-या विद्यार्थ्यांसाठी जास्तीचे जास्तीचे वर्ग | | | शिक्षणाखेरीज इतर उपक्रम | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | घटक | वार्षिक | व्याख्यान | प्रश्नोत्तर | चर्चा | व्याख्यान | प्रश्नोत्तर | चर्चा | मराठी | इंग्रजी | गणित | शारिरीक | समाज | चित्रकला | संगीत | सांस्कृतिक |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 1. | सह्याद्री | 34 | 34 | 26 | 27 | 21 | 19 | 19 | 7 | 6 | 28 | 28 | 9 | 12 | 7 | 2 | 6 |
| 2. | गोंडवन | 26 | 26 | 14 | 16 | 12 | 11 | 17 | 8 | 10 | 18 | 20 | 2 | 10 | 5 | 2 | - |
| | एकूण | 50 | 50 | 40 | 43 | 33 | 30 | 36 | 15 | 16 | 46 | 48 | 11 | 22 | 12 | 4 | 6 |
| | टक्केवारी | 100 | 100 | 80 | 86 | 66 | 60 | 72 | 30 | 32 | 92 | 96 | 22 | 44 | 24 | 8 | 12 |

9. शिक्षणासेरीज इतर कोणकोणते उपक्रम आश्रमशाळांमध्ये राबविले जातात हे पाहिले असता फक्त 22 टक्के आश्रमशाळांमध्ये शारिरीक शिक्षण हा विषय शिकविला जातो. शरीर स्वास्थ्याचे महत्व लक्षात घेता लहान वयापासून मुलांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने शारिरीक शिक्षण हा विषय शाळेत ठेवणे अनिवार्य आहे. परंतू वरील टक्केवारी पाहता हा विषय फारच थोडया आश्रमशाळांमधून शिकविला जात असल्याचे आढळून आले. यासाठी स्वतंत्र पी.टी.शिक्षकांची नेमणूक होत नसल्याचे आढळून आले. 44 टक्के आश्रमशाळामध्ये समाजसेवा, स्काऊट, शेती, वृक्षारोपण इ.उपक्रम राबविले जातात. हे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आढळून आले. त्यानंतर चित्रकला हा विषय 24 टक्के आश्रमशाळांमधून शिकविला जातो. तर 8 टक्के आश्रमशाळांमधून संगीत विषयाचे शिक्षण दिले जात असल्याचे आढळून आले. हे प्रमाण सर्वात कमी असल्याचे आढळून आले. विविध सांस्कृतिक कार्यक्रम 12 टक्के आश्रमशाळांमध्ये राबवित असल्याचे आढळून आले. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, वाचन, लेखनस्पर्धा, रांगोळी स्पर्धा, गॅदरिंग इ.उपक्रमांचा समावेश होता.

तक्ता क्र.3.9

आदिवासी विकास अधिकारी यांचेमार्फत सोडविल्या जाणा-या आश्रमशाळेच्या अडचणी

| अ.क्र. | विभाग सहयाद्री/ गोंडवन | माहिती मागविलेल्या आश्रमशाळा | माहिती उपलब्ध असलेल्या आश्रमशाळा | आदिवासी विकास अधिका-यांकडून अडचणी सोडविल्या जातात का ? | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | होय | नाही |
| 1. | सहयाद्री | 34 | 30 | 28 | 1 |
| 2. | गोंडवन | 26 | 20 | 17 | 3 |
| | एकूण | 60 | 50 | 45 | 4 |
| | टक्केवारी | -- | 100 टक्के | 90 टक्के | 8 टक्के |

उपरोक्त तक्त्यावरुन 90 टक्के आश्रमशाळांनी आदिवासी विकास अधिका-यांकडून आश्रमशाळांच्या अडचणी सोडविल्या जात असल्याचे सांगण्यात आले आहे. तर 8 टक्के आश्रमशाळांनी आदिवासी विकास अधिका-यामार्फत आश्रमशाळेस येणा-या अडचणी व समस्या सोडविल्या जात नसल्याचे म्हटले आहे. उर्वरित 2 टक्के आश्रमशाळांनी अभिप्राय कळविला नाही

3.10 वरील तक्त्यामध्ये सन 1990 व 1991 या दोन वर्षात वेगवेगळया प्रशासकीय अधिका-यांनी दिलेल्या भेटींची संख्या दर्शविण्यात आलेली आहे.

1.उपसंचालक :- आश्रमशाळांचे कामकाज व व्यवस्थापन आणि आश्रमशाळांवर नियंत्रण ठेवणा-या वरिष्ठ अधिका-यांपैकी उपसंचालक हे होत. उपसंचालकांनी आश्रमशाळेस महिन्यातून दोन, तीन महिन्यातून 10 व सहा महिन्यामध्ये प्रकल्पातील सर्व आश्रमशाळांचे ( शासकीय व स्वयंसेवी) इन्सपेक्शन पूर्ण केले पाहिजे.

आश्रमशाळांवर नियंत्रण ठेवणा-या उपसंचालकांनी सन 1990 व 1991 या दोन वर्षात एकूण 27 भेटी दिल्या. त्यातील 15 आश्रमशाळांना दिलेल्या भेटी या एक वर्षाच्या अंतराने, दिलेल्या असल्याचे आढळून आले. उर्वरित 4 भेटी या 1 ते 2 महिन्याच्या अंतराने, 2 भेटी या, 3-5, 7-10 महिन्याच्या अंतराने दिल्या असल्याचे आढळून आले.

2.प्रकल्प अधिकारी :- प्रकल्प अधिका-यांनी महिन्यातून दोन शासकीय आश्रमशाळा, दोन स्वयंसेवी आश्रमशाळा व एक वसतीगृह यांना नियमानुसार भेटी द्यावयाच्या तीन महिन्यात सर्व शाळा तपासून झाल्या पाहिजेत व वर्षातून सर्व शाळांचे इन्सपेक्शन झाले पाहिजे. उपलब्ध 50 आश्रमशाळांच्या माहितीवरुन विविध ठिकाणच्या प्रकल्प अधिका-यांनी आश्रमशाळाना मागील दोन वर्षात एकूण 54 भेटी दिल्या असल्याचे आढळून आले. यामध्ये एक वर्षाच्या अंतराने 19 भेटी दिल्या असल्याचे आढळून आले. सर्वसाधारण 1-2 महिन्याच्या अंतराने 10 भेटी वेगवेगळया आश्रमशाळांना दिल्या गेल्याचे आढळून आले. 3 भेटी या 3 महिन्याच्या अंतराने दिल्या असल्याचे आढळून आले. 3 भेटी 5 महिन्याच्या अंतराने व 4 भेटी 6 महिन्याच्या अंतराने, 8-10 महिन्याच्या अंतराने 3 भेटी व एक वर्षाच्या अंतराने दोन भेटी दिल्याचे आढळून आले.

3. आदिवासी विकास अधिकारी :- आश्रमशाळांना वारंवार भेटी देणा-या अधिका-यांमध्ये आदिवासी विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध झालेल्या 50 आश्रमशाळांना 1990 व 1991 या दोन वर्षात 91 भेटी दिल्या असल्याचे आढळून आले. 1 ते 2 महिन्याच्या अंतराने 31 भेटी, 2-3 महिन्याच्या अंतराने आदिवासी विकास अधिका-यांनी 12 भेटी दिल्या असल्याचे आढळून आले. 4-5 महिन्याच्या अंतराने 6 भेटी, 5-6 महिन्याच्या अंतराने 3 भेटी दिल्याचे आढळून आले. 10 ते 11 महिन्याच्या अंतराने एकही भेट दिली नसल्याचे आढळून आले. एक वर्षाच्या अंतराने 20 भेटी दिल्याचे वरील तक्त्यावरुन आढळून आले.

एक दोन महिन्याच्या अंतराने वारंवार भेटी दिल्या गेल्या. मध्यंतरीच्या काळात भेटींची संख्या फारच कमी झाली व नंतर एक वर्षाच्या अंतराने भेटीचे प्रमाण सर्व

प्रशासकीय अधिका-यांनी वाढविल्याचे वरील तक्त्यावरून आढळून आले. जून, जुलै व ऑगस्ट, महिन्यामध्ये प्रशासकीय अधिकारी भेटी देण्यास सुरवात करतात. त्यानंतर नोव्हेंबर, डिसेंबर महिन्यात भेटींची संख्या वाढते. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी वर्षातून फक्त एकदाच आश्रमशाळेला भेटी देत असल्याचे आढळून आले आहे.

4. **आदिवासी विकास निरीक्षक** :- सदरील भेटीमध्ये मागील दोन वर्षात आदिवासी विकास निरीक्षक यांनी सर्वात जास्त भेटी आश्रमशाळेला दिलेल्या आहेत. एकूण त्यांनी दिलेल्या भेटींची संख्या 111 असल्याचे आढळून आले. आदिवासी विकास निरीक्षक यांनी 1-2 महिन्याच्या अंतराने 53 भेटी दिलेल्या आहेत. 2 ते 3 महिन्यांनी 18 भेटी दिलेल्या आहेत. 4-5 महिन्याच्या अंतराने 5 भेटी दिलेल्या आहेत. 8ते 11 महिन्याच्या अंतराने 3 भेटी तर एक वर्षाच्या अंतराने 15 भेटी दिल्या असल्याचे वरील तक्त्यावरुन उपलब्ध माहितीचे विश्लेषण केल्यानंतर आढळून आले.

5. **उपशिक्षण अधिकारी/गट शिक्षण अधिकारी** :- उपशिक्षण अधिका-यांनी मागील दोन वर्षात एकूण 24 भेटी दिल्याचे आढळून आले. त्यातील आश्रमशाळांना दिलेल्या 15 भेटी या एक वर्षाच्या अंतराने दिल्या असल्याचे आढळून आले.

6. **शिक्षण विस्तार अधिकारी** :- आश्रमशाळांना वारंवार भेटी देणा-या अधिका-यांमध्ये शिक्षण विस्तार अधिका-यांचा तृतीय क्रमांक लागतो. शिक्षण विभागाच्या नियमानुसार

1. बिटमधील प्रत्येक शाळेला दोन महिन्याच्या कालावधीत किमान एकदा भेट देणे आवश्यक आहे.

2. शाळा भेटीचे सर्वसाधारण नियोजन करतांना बीटमधील प्रत्येक प्राथमिक शाळेस वर्षामध्ये तपासणी सोडून 3 भेटी दिल्या जाव्यात. या भेटी शाळेच्या वेळेत दिल्या जाव्यात.

7. **वैद्यकिय अधिकारी** :- उपलब्ध माहितीनुसार वेगवेगळया ठिकाणच्या आश्रमशाळांना वेगवेगळया वैद्यकिय अधिका-यांनी एकूण 28 भेटी दिल्या असल्याचे आढळून आले.

8. **इतर अधिकारी** :- आश्रमशाळेला वारंवार भेटी देणा-या अधिका-यांमध्ये प्रशासकीय अधिका-याव्यतिरिक्त इतर अधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश होतो. त्यामध्ये पुढारी, स्थानिक कार्यकर्ते, इतर वेगवेगळया विभागातील अधिकारी यांचा समावेश होतो. हे अधिकारी आश्रमशाळेला अधूनमधून भेटी देत असतात. अशा भेटींची 1990-91 मधील संख्या

तक्ता क्र·3·10

1990 व 1991 या दोन वर्षातील प्रशासकीय अधिका-यांच्या भेटी व दोन भेटींतील अंतर दर्शविणारा तक्ता

| अ·क्र· | अधिका-याचे नांव | भेटींची संख्या व दोन भेटींमधील अंतर | | | | | | | | | एकूण भेटींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 ते 2 महिन्या-तील भेटी | 2 ते 3 महिन्या तील भेटी | 3 ते 4 म·अंतरा-तील भेटी | 4 ते 5 म·अंतरा तील भेटी | 5 ते 6 म·अंतरा तील भेटी | 6 ते 7 म·अंतरा तील भेटी | 8 ते 10 म·अंतरा तील भेटी | 10 ते 11 म·अंतरा तील भेटी | 11 ते 12 म·अंतरातील भेटी | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 1· | उपसंचालक | 4 | 2 | - | 2 | - | 2 | - | 2 | 15 | 27 |
| 2· | प्रकल्प अधिकारी | 10 | 3 | - | 3 | 4 | - | 3 | 2 | 19 | 44 |
| 3· | आदिवासी विकास अधिकारी | 31 | 12 | 11 | 6 | 3 | 1 | 7 | - | 20 | 91 |
| 4· | आदिवासी विकास निरीक्षक | 53 | 18 | 9 | 5 | 8 | - | 1 | 2 | 15 | 111 |
| 5· | उप शिक्षण अधिकारी/ गट शिक्षण अधिकारी | 2 | 2 | 3 | - | 2 | - | - | - | 15 | 24 |

कृ·मा·प·

| अ. क्र. | अधिका-याचे नांव | भेटींची संख्या व दोन भेटींमधील अंतर | | | | | | | | | एकूण भेटींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1 ते 2 महिन्या-तील भेटी | 2 ते 3 महिन्या तील भेटी | 3 ते 4 म. अंतरा-तील भेटी | 4 ते 5 म. अंतरा तील भेटी | 5 ते 6 म. अंतरा तील भेटी | 6 ते 7 म. अंतरा तील भेटी | 8 ते 10 म. अंतरा तील भेटी | 10 ते 11 म. अंतरा तील भेटी | 11 ते 12 म. अंतरातील भेटी | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| 6. | शिक्षण विस्तार अधिकारी | 20 | 15 | 9 | 7 | 5 | 1 | 2 | 1 | 26 | 86 |
| 7. | वैद्यकिय अधिकारी | 2 | 6 | 4 | 1 | 1 | 2 | 3 | 7 | 26 | 52 |
| 8. | इतर अधिकारी | 14 | 18 | 8 | 3 | 2 | 5 | 11 | 12 | 9 | 82 |
| | एकूण भेटींची संख्या | 136 | 76 | 44 | 27 | 25 | 11 | 27 | 26 | 145 | 493 |

82 असल्याचे आढळून आले आहे.

सर्वसाधारणपणे प्रशासकीय अधिकारी व इतर अधिकारी या सर्वांनी मिळून दोन वर्षात 517 भेटी 50 आश्रमशाळांना दिलेल्या असल्याचे सर्व्हेक्षण पाहणीमध्ये आढळून आले.

यामध्ये सर्वात जास्त भेटी या आदिवासी विकास निरीक्षक यांनी दिल्याचे आढळून आले. शिक्षण विभागाचे अधिकारी आश्रमशाळांची वार्षिक तपासणी व सर्वसाधारण तपासणी यासाठी भेटी देतात. त्यांची संख्या 86 असल्याचे आढळून आले. आदिवासी विकास अधिकारी यांची भेटींची संख्या 91 असल्याचे आढळले.

वैद्यकिय अधिकारी व उपसंचालक यांच्या भेटीचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे आढळून आले. वैद्यकिय अधिका-यांनी व उपसंचालकांनी अनुक्रमे 28 व 27 भेटी मागील दोन वर्षात दिल्या असल्याचे आढळून आले.

वरील तक्त्यावरुन 1 ते 2 महिन्याच्या अंतराने भेटी देण्याचे प्रमाण सर्वात जास्त असल्याचे आढळून आले. तसेच एक वर्षाने भेटी देण्याचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून आले. मध्यंतरीच्या काळात आश्रमशाळांना भेटी देण्याचे प्रमाण एकदम कमी झाल्याचे आढळून आले.

**3.11 विस्तार अधिका-यांनी मागील दोन वर्षात केलेल्या वार्षिक तपासणीचे वर्गीकरण :-**

विस्तार अधिका-यांकडून आश्रमशाळेचा शैक्षणिक दर्जा निश्चित केला जातो.

शिक्षण विभागाच्या सूचना व नियमानुसार :-

1. शालेय वर्षामध्ये शाळेत दिल्या जाणा-या विहित तीन भेटींशिवाय शाळेची वार्षिक तपासणी, शिक्षण विस्तार अधिकारी यांनी करणे अनिवार्य आहे.

2. बीटमधील प्रत्येक शाळेची वर्षातून एकदा सर्वकष वार्षिक तपासणी करावी. विस्तार अधिका-यांनी किती आश्रमशाळांची वार्षिक तपासणी केली हे खालील तक्त्यावरुन आढळून येईल.

तक्ता क्र·3·11

शिक्षण विस्तार अधिका-यांनी केलेल्या वार्षिक तपासणीचे वर्गीकरण {1989-1990}

| अ·क्र | वर्ष | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 2 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 1· | 1989 | 3 | 6 | 5 | 4 | - | - | 1 | - | 3 | - | - | 5 | 27 | 54 |
| 2· | 1990 | 4 | 8 | 10 | 4 | - | - | 1 | 3 | 1 | - | 1 | 3 | 35 | 70 |
|  | एकूण | 7 | 14 | 15 | 8 | - | - | 2 | 3 | 4 | - | 1 | 8 | 62 |  |

वरील तक्त्यावरुन शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यावर सुरवातीचे तीन महिन्यात विस्तार अधिका-यांनी मागील दोन वर्षात आश्रमशाळांची वार्षिक तपासणी अत्यंत कमी प्रमाणात केली असल्याचे आढळून आले. ऑक्टोबरमध्ये विस्तार अधिका-यांनी आश्रमशाळेची वार्षिक तपासणी केली नसल्याचे आढळून आले. डिसेंबर व जानेवारी महिन्यात अनुक्रमे 7 ते 8 इतक्या आश्रमशाळांची तपासणी केली असल्याचे आढळून आले.

वरील तक्त्यावरुन डिसेंबर व एप्रिल पर्यंत वार्षिक तपासणी करण्याचे प्रमाण वाढल्याचे आढळून आले. मागील दोन वर्षात शिक्षण विस्तार अधिका-यांनी एकूण 62 वार्षिक तपासण्या केल्याचे आढळून आले.

# प्रकरण 4 थे

## क्षेत्रिय पाहणी अहवाल - विवेचन

4.1 1. औपचारिक शिक्षण पध्दतीपासून बराच मोठा समाज वेगवेगळ्या कारणांमुळे शिक्षणा पासून वंचित राहिला आहे. उदा :

ए) प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची हजेरी पटावर नांव नोंदणी नसते.

बी) शाळेत विद्यार्थ्यांची नांव नोंदणी असली तरी विद्यार्थी शाळेत जात नसतो.

सी) विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण न करता शाळा मध्येच सोडून देतो. या सर्व प्रकाराला गळती असे म्हणता येईल.

2. क्षेत्रिय निरीक्षणासाठी महाराष्ट्र राज्यातील सह्याद्री विभागातून पुणे, नाशिक, अहमदनगर तर गोंडवन विभागातून अमरावती, यवतमाळ अशा पांच जिल्ह्यातील आश्रमशाळांना भेटी दिल्या.

या मूल्यमापन अहवालामध्ये शाळेत नांव नोंदलेल्या पण मध्येच शाळा सोडून गेलेल्या विद्यार्थ्यांच्या गळतीचा विचार केला आहे. पाहणीसाठी निवडलेल्या आश्रमशाळांमध्ये किती गळती झाली आहे यावर हा मूल्यमापन अहवाल तयार केला आहे. क्षेत्रिय पाहणीमध्ये जी माहिती गोळा केली आहे त्यावरून गळती झालेल्या मुलांच्या कुटुंबांची आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक माहिती व त्यांची गळती होण्याची कारणे यांचे पृथःक्करण निरनिराळ्या तक्त्यांच्या आधारे केले आहे.

तक्ता क्र. 4.1

पाहणी केलेल्या गांवाची व कुटुंबांची माहिती

| अ.नं. | जिल्हा | तालुका | अ.नं. | गांव | कुटुंबांची संख्या | कुटुंबांतील व्यक्तींची संख्या | कुटुंबांची जमात/जात |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | पुणे | मावळ | 1. | वडेश्वर | 2 | 4 | हिंदू महादेव कोळी |
| 2. | पुणे | मावळ | | वडेश्वर | | 5 | --"-- |
| 3. | पुणे | खेड | 2. | टोकवडा | 2 | 6 | --"-- |
| 4. | पुणे | खेड | | टोकवडा | | 4 | --"-- |
| 5. | पुणे | आंबेगांव | 4. | गोहे | 2 | 5 | --"-- |
| 6. | पुणे | आंबेगांव | | गोहे | | 5 | --"-- |
| 7. | पुणे | आंबेगांव | 5. | गाडेवाडी | 1 | 7 | --"-- |
| 8. | नाशिक | कळवण (2) | 6. | मोहमुख (गोहगांव) | 1 | 5 | हिंदू कोकणा |
| 9. | नाशिक | कळवण | 7. | नाळीद खळगी | 1 | 7 | --"-- |
| 10. | नाशिक | कळवण | 8. | चनकापुरा (पांढरी) | 1 | 8 | --"-- |
| 11. | नाशिक | बागलाण | 9. | कोळपेड | 2 | 4 | --"-- |
| 12. | नाशिक | बागलाण | | | | 7 | --"-- |

कृ.मा.पहा..

| अ.नं. | जिल्हा | तालुका | अ.नं. | गांव | कुटुंबांची संख्या | कुटुंबांतील व्यक्तींची संख्या | कुटुंबांची जमात/ जात |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 13. | अहमदनगर | राहुरी {3} | 10. | कोळेवाडी | 3 | 9 | हिंदू महादेव कोळी |
| 14. | अहमदनगर | राहुरी | | | | 6 | --"--- |
| 15. | अहमदनगर | राहुरी | | | | 10 | --"--- |
| 16. | अहमदनगर | राहुरी | 11. | म्हैसगांव | 1 | 6 | हिंदू भिल्ल |
| 17. | अहमदनगर | अकोले | 12. | पाडोशी | 2 | 7 | हिंदू महादेव कोळी |
| 18. | अहमदनगर | अकोले | | | | 7 | हिंदू महादेव कोळी |
| 19. | अहमदनगर | संगमनेर | 13. | जवले बावलेश्वर | 1 | 4 | हिंदू महादेव कोळी |
| 20. | अमरावती | चिखलदरा | 14. | ठेमरू सोंग | 3 | 7 | हिंदू कोरकू |
| 21. | अमरावती | चिखलदरा | | | | 8 | हिंदू कोरकू |
| 22. | अमरावती | चिखलदरा | 15. | चिखली | 1 | 13 | हिंदू कोरकू |
| 23. | अमरावती | चिखलदरा | 16. | उपारिदा | 1 | 9 | हिंदू भानई {एस.सी.} |

कृ.मा.प.ठे

| अ.नं. | जिल्हा | तालुका | अ.नं. | गांव | कुटुंबांची संख्या | कुटुंबांतील व्यक्तींची संख्या | कुटुंबांची जमात/जात |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 24. | अमरावती | धारणी | 17. | भोकरबर्डी | 1 | 11 | हिंदू कोरकू |
| 25. | अमरावती | धारणी | 18. | गंभेरी | 1 | 8 | हिंदू कोरकू |
| 26. | अमरावती | धारणी | 19. | बेरदा | 1 | 6 | हिंदू कोरकू |
| 27. | अमरावती | चांदूर रेल्वे | 20. | चिरोडी | 1 | 7 | हिंदू गोंड |
| 28. | यवतमाळ | मारेगांव | 21. | झनकोला | 1 | 4 | हिंदू गोंड |
| 29. | यवतमाळ | मारेगांव | 22. | रोहपट | 1 | 5 | हिंदू गोंड |
| 30. | यवतमाळ | मारेगांव | 23. | तरारा | 1 | 6 | हिंदू गोंड |
| 31. | यवतमाळ | मारेगांव | 24. | व्यागुलपाडा | 1 | 5 | हिंदू गोंड |
| 32. | यवतमाळ | मारेगांव | 25. | गणेशपूर | 1 | 7 | हिंदू गोंड |
| 33. | यवतमाळ | घाटंजी | 26. | उदरणी | 1 | 7 | हिंदू गोंड |
| 34. | यवतमाळ | पांढरकवडा | 27. | अंबेझरी | 1 | 6 | हिंदू गोंड |
| 35. | यवतमाळ | पांढरकवडा | 28. | अमरेली | 1 | 7 | हिंदू गोंड |
| 36. | यवतमाळ | वणी | 29. | राखयपेठ | 1 | 6 | हिंदू गोंड |
| 36 | 5 | 15 | 27 | 28 | 37 | 238 | |

पाहणीमध्ये पुणे, नाशिक, नगर, अमरावती या पाच जिल्हयांना प्रत्यक्ष भेट देऊन प्रत्येक जिल्हयातून कमीत कमी 2 (दोन) व जास्तीत जास्त चार तालुक्यातील किमान 4 आश्रमशाळांना प्रत्यक्ष भेटी देऊन मुख्याध्यापक / शिक्षक, विद्यार्थ्यांचे पालक, तसेच सामाजिक कार्यकर्ते व शिक्षण विभागाचे अधिकारी यांची समक्ष मुलाखत घेऊन त्यांची मते जाणून घेतली.

पाहणीसाठी एकूण 15 तालुक्यांचा समावेश करण्यात आला. या 15 तालुक्यातील 22 आश्रमशाळांमध्ये पूर्वी शिक्षण घेतलेल्या पण आता शाळा सोडून गेलेल्या एकूण 38 विद्यार्थ्यांच्या कुटुंबांना भेटी दिल्या. या 38 कुटुंबांमध्ये एकूण व्यक्तींची संख्या 256 असल्याचे आढळून आले. पाहणीसाठी निवडलेल्या कुटुंबात महादेव कोळी, गोंड, कोकणा, कोरकू, भिल्ल इत्यादी जमातीतील कुटुंबांचा समावेश करण्यात आला आहे.

4.2 क्षेत्रिय पाहणीमध्ये एकूण 38 कुटुंबांची पाहणी करण्यात आली. त्यामध्ये मुले व मुली मिळून 44 विद्यार्थी शाळेतून गळाल्याचे आढळले. अशा कुटुंबांची विभागणी खालील प्रमाणे केली आहे.

तक्ता क्र. 4.2

पाहणीत निवडलेल्या कुटुंबांची आकारमानानुसार गळतीची विभागणी

| अ.क्र. | कुटुंबांचा आकार | कुटुंबांची एकूण संख्या | गळती झालेली मुले | | | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | |
| 1. | 1 ते 4 व्यक्ती | 5 (13 टक्के) | 3 | 3 | 6 | 14 टक्के |
| 2. | 5 ते 6 व्यक्ती | 13 (35 टक्के) | 11 | 4 | 15 | 34 टक्के |
| 3. | 7 ते 8 व्यक्ती | 15 (39 टक्के) | 7 | 9 | 16 | 36 टक्के |
| 4. | 8 चे वर व्यक्ती | 5 (13 टक्के) | 6 | 1 | 7 | 16 टक्के |
| | एकूण | 38 (100 टक्के) | 27 (61 टक्के) | 17 (35 टक्के) | 44 (100 टक्के) | 100 टक्के |

क्षेत्रिय पाहणीतील कुटुंबांच्या आकारमानाचा विचार केला असता असे दिसून येते की, मुलांच्या गळतीचे प्रमाण 61 टक्के आहे. त्यामानाने मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी असून 39 टक्के मुली शाळेतून गळाल्याचे आढळून आले. त्यामध्ये 7 ते 8 व्यक्तींचे

कुटुंबामध्ये सर्वाधिक म्हणजे 36 टक्के गळती झाल्याचे आढळून आले तर 1 ते 4 कुटुंबांचे आकारमान असलेल्या कुटुंबामध्ये 14 टक्के असल्याचे आढळून आले.

पाहणीमध्ये असे दिसून येते की, 39 टक्के कुटुंबे 7 ते 8 आकारमानाची आहेत तर त्या खालोखाल 5 ते 6 आकारमानाची 35 टक्के कुटुंबे आहेत व 1 ते 4 आकारमानाची 13 टक्के कुटुंबे आहेत.

कुटुंबाच्या आकारमानाचा गळतीवर परिणाम होतो का हे पाहिले असता असे दिसून येते की, 4 पर्यंत व्यक्तींची संख्या असलेल्या कुटुंबातून गळती कमी होते. आकारमान वाढते त्यानुसार गळतीही वाढलेली दिसते. परंतु कुटुंबातील व्यक्तींची संख्या 8 चे वर गेल्यावर गळती कमी दिसते. याचाच अर्थ लहान व मोठया कुटुंबात गळती कमी दिसते तर मध्यम आकारमानाच्या कुटुंबात गळतीचे प्रमाण जास्त आढळते.

थोडक्यात मुलांची संख्या जसजशी वाढत जाते तसतसेगळतीचे प्रमाण वाढते. परंतु मोठया आकारमानाच्या कुटुंबात ते कमी झालेले दिसते. कुटुंबाच्या आर्थिक गरजेनुसार मुला/मुलींना घरची कामे करावी लागतात. मोठया कुटुंबात ही जबाबदारी संभाळण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध असल्याने मुलांना शाळेत जाण्यासाठी भरपूर वेळ मिळतो.

क्षेत्रिय पाहणीमध्ये मुलांच्या तुलनेने मुलींचे गळतीचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले. या संदर्भात पालकांशी चर्चा केली असता असे आढळून आले की, मुलींना आश्रमशाळेत घातल्यावर त्या मन लावून अभ्यास करतात. नापास होणे, शाळा बुडविणे यामुळे मुलींची शाळेतील गळती होत नाही. तर घरकामासाठी मुलींना ठेवून घेणे व लग्न अशासारख्या कारणांसाठीच मुलींना शाळेतून काढून घेतले जाते.

मुलांच्या गळतीचे कारण पालकांकडून जाणून घेतले असता मुले उत्पादक कामासाठी प्रत्यक्ष हातभार लावत असल्यामुळे व कुटुंबाला आर्थिक मदत होत असल्यामुळे पालक मुलांना शाळेत पाठविण्यास नाखूष असतात.

4.3 क्षेत्रिय पाहणीमध्ये निवडलेल्या कुटुंबातील पालकांच्या व्यवसायाशी गळतीचा संबंध आहे काय हे तपासले असता खालील बाबी निदर्शनास आल्या.

तक्ता क्र.4.3

पाहणीतील निवडलेल्या कुटुंबांची व्यवसायानुसार विभागणी

| अ.क्र. | प्रमुख व्यवसाय | एकूण कुटुंबे | व्यवसाय टक्केवारी | दुय्यम व्यवसाय | एकूण | टक्केवारी | प्रमुख व्यवसायानुसार विद्यार्थ्यांची गळती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | शेती | 27 | 71 टक्के | - | - | - | 24 (55 टक्के) |
| 2. | शेतमजुरी | 7 | 18 टक्के | शेतमजुरी | 15 | 40 टक्के | 16 (36 टक्के) |
| 3. | नोकरी | 2 | 5 टक्के | धंदा/हॉटेल | 1 | 3 टक्के | 2 (5 टक्के) |
| 4. | मच्छीमारी | 1 | 3 टक्के | दुग्धव्यवसाय | 2 | 5 टक्के | 1 (2 टक्के) |
| 5. | धंदा | 1 | 3 टक्के | - | - | - | 1 (2 टक्के) |
| | एकूण | 38 | 100 | एकूण | 18 | 48 | 44 (100 टक्के) |

पालकाच्या व्यवसायाशी गळतीचा संबंध आहे काय हे तपासले असता वरील तक्त्यावरून असे आढळून येते की, शेती हा प्रमुख व्यवसाय करणारी 27 (71 टक्के) कुटुंबे आढळून आली. शेतमजुरी हा प्रमुख व्यवसाय करणारी 18 टक्के कुटुंबे आढळली. मच्छीमारी, नोकरी व धंदा हा प्रमुख व्यवसाय करणारी एकूण 11 टक्के कुटुंबे आढळली.

शेतमजुरी हा दुय्यम व्यवसाय करणारी 40 टक्के कुटुंबे आढळली. दुग्ध व्यवसाय, धंदा किंवा हॉटेल व्यवसाय करणारी एकूण 8 टक्के कुटुंबे आढळून आली. व्यवसायाचा गळतीशी फार जवळचा संबंध आहे. शेती करणाऱ्या कुटुंबातील मुलांमध्ये गळती मोठया प्रमाणावर दिसते. अशा कुटुंबामध्ये 55 टक्के विद्यार्थी शाळेतून गळाल्याचे आढळले याचाच अर्थ जे ( Land owner ) शेतकरी आहेत त्यांचे मुलांना शाळेत घालण्याचे व शिकविण्याचे प्रमाण कमी आहे. पण जे शेतमजूर आहेत त्यांना आश्रमशाळेत पाल्याला अन्न मिळण्याची खात्री असल्याने त्यांच्या मुलांचे शिक्षण घेण्याचे प्रमाण तुलनेने जास्त आहे. शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबातील 36 टक्के विद्यार्थी शाळेतून गळाल्याचे आढळते.

4.4 पाहणीतील निवडलेल्या कुटुंबाचे उत्पन्नानुसार वर्गीकरण :

गळालेल्या कुटुंबाचा प्रमुख व दुय्यम व्यवसायाशी जसा संबंध येतो तसाच गळतीचा

कुटुंबाच्या उत्पन्नाशी संबंध आहे का हे पाहणे आवश्यक आहे.

तक्ता क्र. 4.4

पाहणीत निवडलेल्या कुटुंबांची उत्पन्नानुसार गळतीची विभागणी

| अ.क्र. | उत्पन्न (रुपयात) | कुटुंब संख्या | गळालेले विद्यार्थी |
|---|---|---|---|
| 1. | 0 ते 4001/- | 28 (74 टक्के) | 34 (77 टक्के) |
| 2. | 4001 ते 6400/- | 7 (18 टक्के) | 7 (16 टक्के) |
| 3. | 6401 ते 10000/- | 1 (3 टक्के) | 1 (2 टक्के) |
| 4. | 10001 च्या पुढे | 2 (5 टक्के) | 2 (5 टक्के) |
| | एकूण | 38 (100 टक्के) | 44 (100 टक्के) |

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की, निवडलेल्या कुटुंबातील 28 (74 टक्के) कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 4,000/-रुपयापेक्षा कमी आहे तर जास्त 10,000/- च्या पुढे वार्षिक उत्पन्न असणा-यांची संख्या 2 (5 टक्के) एवढी आहे. याचा अर्थ 92 टक्के कुटुंबांचे उत्पन्न 6,400/- रुपयापेक्षा कमी आहे. ही कुटुंबे दारिद्र्य रेषेखालील आहेत.

गरीबीचा शिक्षणातील गळतीशी फार जवळचा संबंध आहे. क्षेत्रिय पाहणीमध्ये 77 टक्के गळालेले विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न 4000/- रुपये पर्यंत होते तर 16 टक्के गळालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न हे 4000/- ते 6400/-च्या दरम्यान होते. याचाच अर्थ कमी वार्षिक उत्पन्न असणा-या पालकांच्या मुलांचे गळतीचे प्रमाण सर्वाधिक आहे. ही गळालेली मुले आई वडिलांना उत्पादक कामासाठी हातभार म्हणून शाळा सोडतात व कुटुंबासाठी आर्थिक मदत करतात. ज्यांचे उत्पन्न जास्त दारिद्र्य रेषेवर आहे अशा पालकांच्या पाल्याचे गळतीचे प्रमाणही कमी असल्याचे निदर्शनास आले.

4.5 शाळा सोडून गेलेली मुले काय व्यवसाय करतात याचा विचार केला असता खालील तक्त्यावरुन असे दिसते की, 44 मुलांपैकी 19 (43 टक्के) मुले शेती व शेतमजुरी करतात. 31 टक्के मुले घरकामात मदत करून अर्थप्राप्तीसाठी अप्रत्यक्ष मदत करीत आहेत असे दिसते. तर 11 टक्के मुले, मुलांना सांभाळणे, गुरे सांभाळणे अशी घरची कामे करून आई वडिलांना इतर मोलमजुरी करण्यासाठी मोकळे ठेवण्याचे काम करीत आहेत.

वरील विवेचनावरुन असे दिसते की, मुलांच्या गळतीचे मुख्य कारण म्हणजे आदिवासी कुटुंबांचे दारिद्रय हेच असण्याची शक्यता आहे.

तक्ता क्र.4.5

गळती झालेल्या मुलांचे व्यवसायानुसार वर्गीकरण

| अ.क्र. | शाळा सोडल्यानंतर करीत असलेला व्यवसाय | गळती झालेल्या मुलांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | शेती | 6 | 14 टक्के |
| 2. | शेतमजुरी | 13 | 30 टक्के |
| 3. | इतर काम (गुरे सांभाळणे, गुरे चारणे इत्यादी) | 11 | 25 टक्के |
| 4. | घरकाम, मुले सांभाळणे | 14 | 31 टक्के |
| | एकूण | 44 | 100 टक्के |

उपरोक्त तक्त्यावरुन जे 31 टक्के मुले घरकाम करीत असल्याचे आढळले त्यामध्ये विद्यार्थीनींची संख्या अधिक असल्याचे आढळून आले. तसेच प्रत्यक्ष शेतात काम करणा-या मुलांचे प्रमाण फक्त 14 टक्के आहे.

# प्रकरण 5 वे

## क्षेत्रिय निरीक्षण व गळतीची कारणे

5·1 क्षेत्रिय पाहणीसाठी महाराष्ट्र राज्यातील नाशिक, नगर, यवतमाळ, अमरावती व पुणे जिल्हयांतील आश्रमशाळांना मार्च व एप्रिल महिन्यात भेटी देण्यात आल्या·

क्षेत्रिय कामकाज पाहणीमध्ये खालील बाबी आढळून आल्या :-

### 1· शालेय इमारत

वसतिगृह व शाळा एकच असल्यामुळे शाळा हे "ज्ञानमंदिर" असून शाळेचे वेगळेपण विद्यार्थ्याला वाटत नाही· राहणे व शिक्षण एकाच ठिकाणी असल्याने आजारी विद्यार्थ्याची कुचंबणा होते· विश्रांतीची योग्य सोय नसल्याने आजारी विद्यार्थ्यांना घरी पाठविण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो·

निवडलेल्या 50 आश्रमशाळांची इमारत 4331 विद्यार्थ्यांना पुरते आणखी 2391 विद्यार्थ्यासाठी 97 खोल्यांची आवश्यकता असल्याचे आढळून आले·

पाहणीमध्ये 78 टक्के आश्रमशाळांना स्वतःच्या मालकीची शासकीय इमारत असल्याचे आढळून आले·

50 आश्रमशाळांपैकी 78 टक्के आश्रमशाळांना स्वतःची इमारत आहे· 10 टक्के आश्रमशाळा भाडयाच्या इमारतीमध्ये भरतात· यातील 36 टक्के इमारतीचे बांधकाम कच्चे आहे व राहिलेल्या इमारतींचे बांधकाम पक्के आहे· मुले, विद्यार्थी व अस्तित्वात असलेल्या खोल्यांचा विचार करता अजून 97 खोल्यांची आवश्यकता आहे·

### 2· गळतीचे प्रमाण

गळतीची टक्केवारी प्रत्येक जिल्हयात वेगवेगळी असल्याचे आढळून आले· सहयाद्री विभागातील आश्रमशाळांमध्ये 60 टक्के च्या वर गळती झालेले ठाणे, पुणे व जळगांव हे तीन जिल्हे आढळून आले तर गोंडवन विभागातून 60 टक्के च्या वर गळती झालेला नागपूर जिल्हा आढळून आला·

गोंडवन विभागातील अकोला जिल्हयातील आश्रम शाळांमध्ये प्राथमिक विभागात 90 टक्के व माध्यमिक विभागात 48 टक्के गळती झाल्याचे आढळून आले. इतर जिल्हयांशी तुलना करता अकोला जिल्हयाचे गळतीचे प्रमाण सर्वाधिक (90 टक्के) असल्याचे आढळले. वरील जिल्हयामध्ये विद्यार्थ्यांची गळती सर्वाधिक आढळली. कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक कारणांसाठी गळती झाल्याचे आढळून आले.

3. अध्यापन पध्दती

-----------

आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी कोणती अध्यापन पध्दती वापरली जाते हे जाणून घेतले असता 86 टक्के आश्रम शाळांमध्ये प्रश्नोत्तर पध्दती, 80 टक्के आश्रमशाळांमध्ये व्याख्यान पध्दतीचा वापर केला जात असल्याचे आढळले.

शिक्षकांची प्रत्यक्ष मुलाखत घेतली असता वरील दोन्ही अध्यापन पध्दती परिणामकारक असून विद्यार्थ्यांना दिले जाणारे ज्ञान आत्मसात करण्यास सुलभ आहे असे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांना ह्या संदर्भात विचारले असता प्रॅक्टीकलवर जास्त भर देण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

4. मातृभाषेतून शिक्षण

-----------

महाराष्ट्रामध्ये मराठीतून शिक्षण दिले जाते. आदिवासी जमातीतील काही जमातींची मातृभाषा मराठी शिवाय वेगळी आहे. त्यांना मराठीतून शिक्षण घेणे अवघड व कठीण वाटते. त्यामुळे मुले शाळेत रमत नाहीत. मुख्याध्यापकांची मुलाखत घेतली असता कोरकू, गोंड या जमातीतील मुलांना मराठीतून शिकविलेले समजत नाही म्हणून शाळा सोडून देतात असे मत दिले. तसेच या मुलांना हिंदीतून शिकवावे लागत असल्याचेही मुख्याध्यापकांनी सांगितले. यासाठी त्यांच्याच मातृभाषेतून शिक्षण देण्यात यावे.

गोंडवन विभागातील 10 व सह्याद्री विभागातील 6 आश्रम शाळांमध्ये मराठी या विषयासाठी जादाचे क्लासेस घेतले जातात.

5. शैक्षणिक तपासणी

-----------

आश्रम शाळेची शैक्षणिक तपासणी शिक्षण विभागामार्फत होते. गट शिक्षण अधिकारी व शिक्षण विस्तार अधिका-यांना आश्रम शाळांना भेटी देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करणे, वार्षिक तपासणी करणे इत्यादी बाबी त्यांच्याकडून तपासल्या जातात. महिन्यातून किमान दोन भेटी शाळांना

गाळ्यात अशा सूचना असताना 1989-90 व 1990-91 या दोन वर्षात शिक्षण विस्तार अधिका-यांनी एकूण 86 तर गट शिक्षण अधिका-यांनी 24 भेटी दिल्याचे आढळून आले.

आश्रम शाळांची वार्षिक तपासणी शैक्षणिक वर्षाच्या शेवटी करण्यात येते. निवडलेल्या आश्रम शाळापैकी 1989 मध्ये 27 (54 टक्के) शाळांची व 1990 मध्ये 35 (70 टक्के) आश्रम शाळांची वार्षिक शैक्षणिक तपासणी केल्याचे आढळून आले. दरवर्षी सर्व आश्रम शाळांची वार्षिक तपासणी होणे शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

6. कुटुंबाचे आकारमान

पाहणीमध्ये कुटुंबाच्या आकारमानाचा गळतीवर परिणाम होत असल्याचे आढळून आले. ज्या कुटुंबाचे आकारमान छोटे तसेच मोठे आहे अशा कुटुंबामध्ये गळतीचे प्रमाण कमी असल्याचे आढळले. छोटया कुटुंबात व्यक्तींची संख्या मर्यादित असल्याने पालक मुलांना शाळेत पाठविण्यास इच्छुक असतात तर मोठया कुटुंबात मिळवत्या व्यक्तींची संख्या जास्त त्यामुळे मुलांना शाळेत पाठविण्यात अडचणी येत नाहीत. पाहणीमध्ये 5 ते 8 व्यक्तींच्या मध्यम आकारमानाच्या कुटुंबात 70 टक्के गळती म्हणजेच मोठया प्रमाणावर गळती झाल्याचे आढळून आले.

7. कुटुंबाचे उत्पन्न

कुटुंबाला मिळणा-या उत्पन्नावर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अवलंबून असते. पाहणीमध्ये ज्यांचे उत्पन्न कमी आहे अशा पालकांची मुले शाळा सोडून दिलेली आढळली. शाळा सोडून दिलेल्या 77 टक्के विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न 4000/- रुपयांपर्यंत होते. उत्पन्न जितके जास्त तितके गळतीचे प्रमाण कमी होत असल्याचे आढळले. गळतीचा उत्पन्नाशीही काही संबंध दिसून येतो. शाळा सोडल्यानंतर ही मुले आई वडिलांना शेती कामात मदत करणे, तसेच आर्थिक कारणासाठी मदत म्हणून शाळा सोडून देत असल्याचे आढळले.

8. गळालेल्या विद्यार्थ्यांचा सध्याच्या कामाचा तपशिल

क्षेत्रिय पाहणीमध्ये 38 कुटुंबातील शाळेतून गळलेल्या विद्यार्थ्यांच्या माहितीचे संकलन केले असता 45 मुलांनी शाळा सोडून दिल्याचे आढळले. पैकी मुलींचे लग्न ठरणे, होणे घरकाम, लहान भावंडांना सांभाळणे व मोलमजुरी इ. साठी शाळा सोडून दिल्याचे आढळले. मुलांनी शेती, शेतमजुरी, गुरे सांभाळणे इत्यादी कारणांसाठी शाळा सोडून

दिल्याचे आढळले·

9· इतर निरीक्षणे

---------

पाण्याची समस्या :

-----------

1· भेटी दिलेल्या बहुतेक आश्रम शाळेत पाण्याची तिव्र टंचाई असल्याचे आढळून आले· त्यामुळे मूली व मुलांना ओढ्यावर/नदीवर आठवडयातून फक्त सुट्टीच्या दिवशी आंघोळीसाठी जावे लागते· त्यांच्या बरोबर एकही शिक्षक/शिक्षिका नसतात· अस्वच्छतेमुळे सर्व आश्रम शाळांमध्ये त्वचारोगाचे प्रमाण आढळून आले·

दळणवळणाचा अभाव :

-------------

2· पावसाळ्यामध्ये काही आश्रमशाळांच्या दळण वळणाचा प्रश्न निर्माण होतो· त्यामुळे अशा प्रकारच्या शाळांवर चार चार महिने नियंत्रण ठेवणे अवघड जाते·

3· आश्रम शाळेतील धान्याचा साठा ठेवण्यासाठी हवेशीर व मोठ्या जागा उपलब्ध नाही· त्यामुळे उंदीर, घुशी, ढेकूण, पिसवा यांचा त्रास होतो·

4·वैद्यकीय सुविधांचा अभाव :

----------------

आश्रम शाळांची पाहणी केली असता वैद्यकीय अधिकारी आश्रम शाळांना ठरल्याप्रमाणे भेटी देत नाहीत· भेटी दिल्यावर सर्व विद्यार्थ्यांची एकाचवेळी तपासणी करीत नाहीत· वार्षिक शारीरिक तपासणी की जी आरोग्याच्या दृष्टीने महत्वाची आहे ती काही शाळांमध्ये झाली नसल्याचे आढळून आले· वरील कारणांमुळेही सुज्ञ पालक मुलांना शाळेतून काढतात· शिक्षकांच्या रिक्त जागांमुळे पालक मुलांना पाठविण्यास नासूष असतात· विशेषतः 7 वी तून 8 वीत आल्यावर ही परिस्थिती निर्माण होते·

5·शिक्षकांची रिक्त पदे :

-------------

काही आश्रम शाळांमधून मंजूर झालेल्या पदापेक्षा शिक्षकांची संख्या कमी आहे· पोस्ट बेसिक आश्रम शाळेत सर्व विषयांसाठी स्वतंत्र शिक्षक नाही· त्यामुळे मराठी, इंग्रजी, गणित व शास्त्र विषयांची विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याचे आढळून आले·

6. आश्रम शाळांना प्रत्यक्ष भेटी दिल्या असता आश्रम शाळांमध्ये मुलींची व्यवस्था बघण्यासाठी, मुलींच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रात्रपाळीसाठी स्वतंत्र स्त्री कर्मचारी नाही. मुलींसाठी स्वतंत्र संडास, बाथरूम नाही. काही ठिकाणी बाथरूम असले तरी त्याचा वापर होत नसल्याचे आढळून आले आहे. त्यांच्या आवश्यक सुविधांकडे दुर्लक्ष झालेले असल्याचे आढळून आले आहे. काही आश्रम शाळेत संडास, मुता-या बांधल्याचे आढळून आले, पण पाण्या अभावी त्यांचा वापर होत नसल्याचे आढळून आले.

7. मुलींसाठी स्वतंत्र सुविधांचा अभाव :
-----------------------

भेटी दिलेल्या आश्रमशाळेत सकाळी व सायंकाळच्या प्रार्थनेस विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक हजर रहात नाहीत त्यामुळे शिक्षकांतच शिस्तीचा अभाव व दुरावा आढळून येतो.

8. भेटी दिलेल्या सर्व आश्रम शाळेतील स्वयंपाक घरात जाळी, जळमटे, कोळीष्टके व धुराने काळया झालेल्या भिंती आढळून आल्या.

9. पाहणीमध्ये असे आढळून आले की, काही ठिकाणी वसतिगृहातील मुला-मुलींची संख्या 200 ते 300 च्या वर आहे. परंतु त्यांच्यासाठी एकच अधीक्षक काम करीत आहे. एका अधीक्षकास एवढया मोठया संख्येतील विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवणे व त्यांच्या सर्व सुविधांकडे लक्ष देणे त्याच्या आवाक्याबाहेरचे आहे. महाविद्यालयीन विद्यार्थी बहुतांश बाबतीत स्वावलंबी असतात. त्यांच्याकरिता असलेल्या वसतिगृहात 120 संख्येस वरिष्ठ श्रेणीचे अधीक्षक देण्यात आलेले आहेत. परंतु आश्रमशाळेतील लहान विद्यार्थ्यांची जास्त जबाबदारीने काळजी घेणे आवश्यक असतानाही निम्न श्रेणीच्या अधीक्षकांनी कोणत्याही कर्मचा-याच्या सहाय्याशिवाय हे काम करण्याची अपेक्षा अनाठायी वाटते. त्यामुळे विद्यार्थ्यांची होणारी आबाळ थोडया प्रमाणात का होईना गळतीस कारणीभूत होते.

10. शहरी भागातल्या विद्यार्थ्यांना 3 वर्षे पूर्ण झाल्यानंतर बालवाडीत घातले जाते. 2 वर्षे तिथे शिक्षण घेऊन 6 व्या वर्षी इ. 1 लीत प्रवेश दिला जातो. म्हणजे बाल्यावस्थेपासून मूल शैक्षणिक वातावरणात वाढत असते. त्यांचे पूर्व प्राथमिक शिक्षण तेथे पूर्ण झालेले असते. आदिवासी ग्रामीण भागातील मुले एकदम 6 व्या वर्षी शाळेत घातली जातात त्यांना शैक्षणिक वातावरण नवीन असते, अभ्यासाची पूर्व तयारी झालेली नसल्याने अभ्यासक्रम अवघड वाटून मुले शाळा सोडण्यास प्रवृत्त होतात.

5.3 विद्यार्थ्यांची शिक्षणातील गळतीची कारण मिमांसा

आदिवासींच्या मुलांना लहानपणापासून काम करण्याची सवय असते. जीवन संघर्ष इतका तीव्र आहे की, शिक्षणासारखी प्राथमिक गरजही विचारा पलीकडची वाटू लागते. महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शाळेत प्रवेश न घेणा-या वयोगटातील मुलांची संख्या 30 लाख इतकी आहे त्यामध्ये 20 लाख मुली आहेत.

केवळ साक्षरता हे शिक्षणाचे मोजमाप होऊ शकत नाही. तरी देखील एखाद्या समाजात शिक्षणाचे प्रमाण किती आहे यावरून त्या समाजाची प्रगती कोणत्या पातळीवर आहे याची कल्पना येऊ शकते.

सर्वेक्षणातून गळती झालेल्या मुलांच्या गळतीची कारणे काय होती याचे पृथःक्करण केले असता त्याचे निष्कर्ष खालील प्रमाणे आढळून आले :-

1. आर्थिक कारण :

अ) निवडलेल्या 38 कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहिली असता 92 टक्के कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 6400/- रूपयापेक्षा कमी आहे. त्यामुळे कुटुंबातील लहान मुले प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे कुटुंबाच्या आर्थिक उत्पन्नासाठी मदत करीत असतात. शाळेत जाण्याच्या वयात शाळेत न जाता घरीच रहावे लागत असल्यामुळे मुलांचा शाळेत जाण्याचा ओढा कमी होतो.

ब) पाहणी केलेल्या कुटुंबातील 71 टक्के कुटुंबाचा व्यवसाय शेती व 18 टक्के कुटुंबांचा व्यवसाय शेतमजुरी असल्याने शेतीच्या हंगामामध्ये मुलांना शाळेत पाठविणे पालकांना परवडत नाही. त्यामुळे मुलांची शाळा बुडते व ती अभ्यासात मागे पडतात त्यामुळे नापास होतात म्हणून नाईलाजाने त्यांना शाळा सोडावी लागते.

पाहणीमध्ये असे आढळून आले की, पटाच्या प्रमाणात आश्रम शाळांना खोल्या नाहीत. काही आश्रम शाळेतून भाडयाच्या खोल्यांमध्ये वर्ग भरवावे लागतात. अशा खोल्या कोंदट अंधा-या असतात तर काही ठिकाणी झोपडीवजा इमारतीतही शाळा भरतात. अशा झोपडयांना पुरेसा प्रकाश, खेळती हवा व सूर्यप्रकाश मिळत नाही. तसेच पावसाळयामध्ये या इमारतींचे छपरातून पाणी आत गळते, जमिनीला ओल येते. अशा परिस्थितीमध्ये मुलांना सलग 5-5 तास बसणे कठीण होऊन बसते. स्वतःच्या घरी देखील मुले सलग 5-5 तास घरात कधीच थांबत नाहीत. अशा वेळी मुले कधी कधी आजारी पडतात तर लहान मुलांना शाळेचे आकर्षण वाटेनासे होते व त्याचा परिणाम म्हणून मुले शाळा सोडून देतात.

ब) विद्यार्थी पालकांपासून दूर :

वयाच्या 6 व्या वर्षापासून मुलांना आश्रम शाळेत घालावे लागत असल्याने पालक व मूलगा यांच्यात ताटातूट होते. मुलांना कौटुंबिक वातावरणापासून वंचित केले जाते. सुट्टीत मुले घरी गेल्यावर सुटी संपल्यावर आश्रम शाळेत येण्याचे टाळतात. हे प्रमाण लहान मुलांच्या बाबतीत जास्त आढळते कारण त्यांना घरची ओढ जास्त असते व आई वडिलांपासून दूर राहू शकत नाहीत.

क) प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र शिक्षक नाही. एकाच शिक्षकाला दोन-दोन विषयांचे अध्यापन करावे लागते. अशावेळी अध्यापन दर्जेदार होईलच असे नाही. शिक्षकांनाही शिकविण्यामध्ये रस वाटेनासा होतो. पर्यायाने मुले शाळेत कंटाळतात. अभ्यासात गोडी वाटेनाशी होते व त्याचे पर्यावसन शाळा सोडण्यात होते.

ड) शिक्षकांसाठी निवास व्यवस्था :

आश्रम शाळेतील शिक्षकांसाठी शासनाने निवासस्थाने बांधली आहेत. परंतु ही निवासस्थाने सर्व शिक्षकांसाठी पुरेशी व योग्य नाहीत. शिक्षकाला शाळेत योग्य वातावरण व पुरेशी शैक्षणिक व्यवस्था असावयास हवी ती मिळत नाही. त्यामुळे शिकविण्यापूर्वी अभ्यास करण्याची इच्छा असूनही पूर्ण होत नाही. माहिती मागविलेल्या 50 आश्रम शाळांमधील 437 शिक्षकांपैकी 217 शिक्षकांना निवासस्थाने उपलब्ध आहेत. उर्वरित शिक्षकांपैकी काही शिक्षक गावात राहतात. गावात जागा उपलब्ध न झाल्यास जेथे जागा भाड्याने मिळेल किंवा शिक्षकांच्या मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने सोयीस्कर ठिकाणी व भाड्याने जागा घेतात. अशा वेळी शिक्षकांचे मन शाळेत रमत नाही व त्याचा परिणाम शिकविण्यावर होतो हे टाळण्यासाठी सर्व शिक्षकांना निवास व्यवस्था उपलब्ध करून देणे जरुरीचे आहे.

इ) आश्रमशाळेतील शिक्षकांची बदली व नेमणुका

1. आश्रमशाळेतील शिक्षकांची पदे दिर्घ काळ रिक्त राहू नयेत म्हणून अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात (6 महिन्यांसाठी) शिक्षकांची नेमणूक केली जाते किंवा प्रादेशिक निवड मंडळाकडून पद भरेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपातील शिक्षकांच्या नेमणुका केल्या जातात.

2. दुय्यम सेवा मंडळाकडून पुरस्कृत उमेदवार प्राप्त होतात.

3• शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीस प्रशासकीय तसेच तक्रारी नुसार होणा-या बदल्या•
या सर्वांचा परिणाम विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा घसरण्यावर होतो•

हे टाळण्यासाठी किमान 5 वर्षे पर्यंत शिक्षकांची व किमान 3 वर्षे पर्यंत मुख्याध्यापकांची बदली करण्यात येऊ नये•

4• सर्व आश्रमशाळांमध्ये शरीरशास्त्र हा विषय शिकविण्यासाठी स्वतंत्र शिक्षकांची नेमणुक करण्यात यावी•

ई) करमणुकीचे साधनांचा अभाव

आश्रम शाळा या निवासी आहेत• शाळे व्यतिरिक्त उरलेला वेळ मुलांना मोकळीक असते• अशावेळी मुलांना खेळण्यासाठी खेळाचे साहित्य पुरविले पाहिजे• आश्रम शाळांमध्ये खेळाचे साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसते किंवा शिक्षक हे साहित्य त्यांना देत नाही• काही वेळा शाळेला खेळाचे मैदानाचा अभाव असतो• शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी आर्थिक तरतूद वाढविण्याची गरज आहे• त्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी दूरचित्रवाणी संच व रेडिओ अशा दृकश्राव्य माध्यमांचा अभाव आहे• मुलांना अभ्यासाबरोबर टी•व्ही•सेटस्, रेडिओ व खेळ, वाचनालय तसेच इतर सांस्कृतिक कार्यक्रम यांची जोड दिल्यास मुलांचे मन शाळेत रमेल, ज्ञानात भर पडेल व गळतीचे प्रमाण त्यामुळे कमी होईल•

3• शारीरिक कारणे

विद्यार्थ्यांचे आजारपण :-

आश्रम शाळा या वसतिगृहयुक्त शाळा अशा स्वरूपाच्या असतात• राहणे व अध्ययन एकाच खोलीत चालत असते• त्यामुळे आजारपणामध्ये आजारी विद्यार्थ्याला विश्रांतीसाठी जागा उपलब्ध नसते• अशा वेळी जुजबी गोळया देऊन विद्यार्थ्याला घरी पाठविण्यात येते• विद्यार्थी आजारपणातून बरा झाला तरी आणखी काही दिवस आश्रम शाळेकडे फिरत नाही व शाळेकडे दुर्लक्ष होते त्यामुळे विद्यार्थी नापास होतात व शैक्षणिक गळती होते•

## शिक्षणाबाबत अनास्था

आदिवासी जमातीत अजूनही शिक्षणा बाबतची अनास्था कायम आहे• त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन वेगळा असल्याने ते पुढचा विचार करीत नाहीत• मुले शाळा शिकून मोठी होतील• नोकरीला लागतील व त्यांचे जीवनमान सुधारेल याचा विचार न करता शाळेत जाणा-या वयोगटातील मुलांकडून आर्थिक उत्पन्न करुन घेण्याचा पालक विचार करतात व मुलांना शाळा सोडण्यास भाग पाडतात•

## सामाजिक कारणे

### 1• अंधश्रध्दा :

ग्रामीण भागातील बराच मोठा समाज मंत्र तंत्र, भगत, अंगात येणे अशा अंधश्रध्देला बळी पडला आहे• मुलगा आजारी पडला तर डॉक्टरांकडे नेऊन औषधोपचार न करता भगताकडे नेऊन अंगारे, धुपारे व मंत्र तंत्र करतात• तसेच शाळा शिकला तर देव कोपेल अशी भिती घालतात• त्याचा परिणाम मुले व कुटुंबावर होतो व शेजारी पाजारी असणा-या मुलांमध्ये सुध्दा शाळा सोडून देण्याचा विचार उत्पन्न होतो व त्यामुळे गळती होते•

### 2• कौटुंबिक वातावरण

अशैक्षणिक वातावरण, पालकांचा अशिक्षितपणा, शिक्षणाला महत्व न देण्याची वृत्ती इत्यादीचा शालेय वयोगटातील मुलांच्या मनावर जास्त पगडा राहतो व त्याची परिणती गळतीत होते•

### 3• परंपरागत व्यवसायाकडे कल

काही पालकांना असे वाटत असते की, परंपरागत व्यवसाय करावेत किंवा हाताखाली कामे करुन आपल्या घरच्या उद्योगात सामील व्हावे• त्यासाठी शिक्षणाची गरज भासत नाही• उलट शिक्षण घेऊन मुलगा आपला व्यवसाय करील की नाही ही भिती वाटत असल्याने त्याला शाळेमध्ये घालून शिकविण्याचे धाडस पालक करीत नाही आणि केलेच

तर अक्षर ओळख व अंकज्ञान व्हावे इतपत शिक्षण त्यांना भरपूर वाटते म्हणून मुलांची शाळेतून गळती होते•

4• लहान मुलांची मानसिक अवस्था

इयत्ता 1 ली ते 4 थी पर्यंतची मुले लहान वयोगटातील असतात त्यांना पालकांच्या प्रेमाची गरज असते• अशी मुले शाळेत घातली तरी मानसिक दृष्टया उदास असतात• म्हणून वारंवार घरी पळतात व घरी गेल्यावर आश्रम शाळेत लवकर येण्याचे टाळतात•

5•4 प्रचलित शिक्षण पध्दतीतील दोष {अडचणी}

1• अभ्यासक्रम

शिक्षण म्हणजे अक्षरज्ञान, अंकज्ञान सध्या दिले जाणारे शिक्षण हे म्हणजे नोक-या उपलब्ध व्हाव्यात असे पुस्तकी ज्ञान होय• त्यामध्ये धंदे शिक्षण जीवनाशी सुसंगत असणारे शिक्षण दिले जात नाही• अभ्यासक्रम शहरी मुलांचा विचार करून तयार केला जातो• आदिवासी व डोंगराळ भागातील मागास विद्यार्थ्यांचा विचार करून अभ्यासक्रम तयार केला जात नाही• त्यामुळे आदिवासी भागातील मुलांना अभ्यासक्रम समजत नाही व अवघड वाटतो, झेपत नाही त्यामुळे शाळेमध्ये गोडी वाटत नाही व मुले शाळा सोडून जातात•

2• मुलांची मानसिक अवस्था

आदिवासी भागातील मुलांना शेतात काम करावे लागते, घरी लहान भावंडांना सांभाळावे लागते• 10 ते 5 शाळा, शाळेत उशिरा आल्यावर शाळेतली शिक्षा, घरची कामे केली नाही तर शाळा सोडून टाकण्याची शिक्षा या सर्व त्रासाला मुले कंटाळतात व शाळा सोडून देतात•

3• शिकविण्याची पध्दत

मुलगा 6 वर्षाचा झाल्यावर घरातून शाळेत शिकण्यासाठी जातो• घरात एका भाषेत

बोलत असेल व शाळेत शिक्षक वेगळ्या भाषेतून शिकवत असतील तर त्या मुलांना काहीच कळत नाही व मुलांना शिक्षकांच्या भाषेत बरोबर उत्तरे देता येत नाहीत. त्यामुळे मुलांमध्ये व शिक्षकांमध्ये दुरावा उत्पन्न होऊन शिक्षणाबाबत मुलांच्या मनात अढी उत्पन्न होते व शेवटी मुलगा शाळा सोडून जातो.

4. परीक्षा पध्दत

नवीन परिक्षा पध्दतीमध्ये इयत्ता 4 थी पर्यंत मुलगा नापास होता कामा नये असे असल्याने व काही वर्गांची परिक्षा न घेता मुले वरचे वर्गात घातली जात असल्याने अभ्यासात कच्ची मुले वरच्या वर्गात जातात पर्यायाने त्यांचा अभ्यासाचा पाया कच्चा राहतो व पुढे अभ्यासात इतर मुलांप्रमाणे प्रगती होत नसल्याने. पुढच्या वर्गावर त्याचा परिणाम होतो व त्यांच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होऊन शाळा सोडण्याची इच्छा होते.

परिक्षांमध्ये मिळणाऱ्या गुणांवर मुलांचे भवितव्य अवलंबून असते. शिक्षक निकाल चांगला कसा लागेल याकडे जास्त लक्ष देतात. त्यामुळे परिक्षेत आवश्यक गुण मिळविण्यात कमी पडणारा मुलगा नापास होतो. त्यांच्या अंगी असणाऱ्या दुसऱ्या कलागुणांचा विचार केला जात नाही त्यामुळे विद्यार्थी निराश होतो व नापास झाल्यावर त्याचे मन शाळा सोडून जाण्याकडे वळते.

5. शिक्षक वर्ग

शहरी भागातून ग्रामीण भागात आणि त्यातल्या त्यात आदिवासी भागात शिक्षक नेमला गेला तर त्याला शाळेबाबत शिक्षणाबाबत अगर विद्यार्थ्यांबाबत आपुलकी, आस्था व प्रेम असत नाही. अशी ध्येय, निष्ठा अगदी थोडक्या शिक्षकांमध्ये आढळून येते. त्यास ग्रामीण भागातील वातावरणही कारणीभूत आहे. एखादे चांगले काम करण्याची इच्छा असूनही तेथील वातावरणामुळे ते त्यांना करता येत नाही. त्यांना तेथे मान नसतो. सामाजिक प्रतिष्ठा नसते, शाळे व्यतिरिक्त इतर कामे दिली जाणे व त्यातील काही कामे न झाल्यास दूषित भावनेने वेतनवाढीस विलंब करणे इ. सारख्या गोष्टी होत असल्याने, शिक्षकाचे शाळेकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे अभ्यासात मुले कच्ची राहतात व पुनः पुनः नापास होऊन शेवटी शाळेतून गळतात.

ज्या परिसरातून विद्यार्थी शाळेत येतो तेथील स्थानिक गरजा व शाळेचे वेळापत्रक यात मेळ न बसल्याने मुलांना शाळा नुकसानी लागते. त्याचा परिणाम अभ्यासात पाहिजे तितकी प्रगती होत नाही. शेवटी मुलगा नापास होऊन शाळेमधुनी गळती होते.

6. मुलींना आत्मसन्मान व संरक्षणात्मक शिक्षण नाही.

आत्मविश्वास तयार होईल असा अभ्यासक्रम आज मुलींसाठी अस्तित्वात नाही. मुलींसाठी स्वसंरक्षणात्मक अभ्यासक्रम नाही त्यामुळे सामाजिक असुरक्षितता वाढते. बलात्कार, हुंडाबळी सारख्या प्रकारांमध्ये वाढ होत आहे. सामाजिक असुरक्षिततेमुळे पालक मुलींना एकटी शाळेत पाठविण्यास तयार होत नाहीत.

7. पुरुषप्रधान संस्कृती

घरात समान वयाची मुलगा व मुलगी असेल तर मुलाच्या शिक्षणाला प्राधान्य दिले जाते व मुलीच्या शिक्षणाचा हक्क डावलला जातो ही वस्तुस्थिती आहे. यामुळे मुलींची गळती होते.

प्रकरण 6 वे

## शासकीय आश्रमशाळेतील अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांची गळती कमी करण्यासाठी उपाय योना

---

**प्रास्ताविक :-**

6.1 शिक्षणातील गळतीची कारणमिमांसा मागील प्रकरणात केली आहे. त्यामध्ये मुख्यतः आर्थिक, सामाजिक, भौतिक व शैक्षणिक अशी चार प्रमुख कारणे दिसतात. आदिवासी भागातील मुलांसाठी शिक्षण, राहणे, जेवण, शालेय गणवेष व इतर अनेक सुविधा मोफत पुरविल्या जात असल्या तरी गळतीचे प्रमाण पुष्कळ आहे. आदिवासी समाजातील पालकांचे दारिद्रय एवढे आहे की, त्यांना त्यांच्या संसाराचा गाडा चालविण्यासाठी आपल्या पाल्याच्या श्रमाची अनेक त-हेने गरज भासते. जोपर्यंत ग्रामीण भागातील पालकांना शिक्षणाचे महत्व पटत नाही, तोपर्यंत गळतीचे प्रमाण कमी होणे कठीण दिसते.

तरीही गळतीची मूळ कारणे दूर करण्याचा प्रयत्न करणे जरुरीचे आहे. त्यामध्ये खालील प्रमाणे उपाय योजले तर गळती ब-याच प्रमाणात कमी होईल, असे वाटते. आदिवासी भागात शिक्षणाबाबत जागृती करण्यासाठी प्रसार माध्यमांचा जास्तीत जास्त उपयोग करण्याची गरज आहे.

**आर्थिक उपाय योजना :-**

6.2 अ) जी मुले कुटुंबासाठी आर्थिक प्राप्ती करण्यासाठी शाळा सोडतात अशा मुलांसाठी रात्रीच्या शाळा किंवा अनौपचारिक शिक्षण पध्दती सुरु करण्यात यावी. अशा मुलांना शाळेत येण्यास प्रवृत्त करण्यासाठी दरमहा त्यांना काही आर्थिक मदत करावी जेणेकरुन पालक अशा मुलांना शाळेत जाण्यास आडकाठी करणार नाहीत.

ब) ज्या मुलांना लहान भावंडे सांभाळण्यासाठी तसेच गुरे सांभाळण्यासाठी गैरहजर रहावे लागते किंवा शाळा सोडावी लागते, अशा मुलांना शाळेत येण्यास मोकळीक मिळावी म्हणून "गांव तेथे पाळणाघर" स्थापन करण्यात यावे. पाळणाघरे चालविण्यासाठी स्वयंसेवी संस्थांकडे देण्यात यावीत किंवा अंगणवाडी प्राथमिक शाळेला सोडण्यात यावी. गुरे सांभाळण्यासाठी शासनाने गावासाठी एखादा माणूस नेमावा व मुलांची सोडवणूक व्हावी यासाठी गायराने गांवात असावीत.

क) मुलांच्या श्रमाची मदत न घेता कुटुंबांसाठी आर्थिक मदत व उपजीविकेचे पुरेसे साधन उपलब्ध होईल असे कार्यक्रम राबविण्यात यावेत. उदा. कुक्कुट पालन, वराह पालन, पशुसंवर्धन, परिसर शेती उत्पादन, स्त्रियांसाठी बांबूच्या टोपल्या, फळांचे मुरांबे, लोणची व तत्सम छोटे उद्योगधंदे यांची जोड शिक्षणाला द्यायला हवी. कमकुवत गटातील जी मुले शाळेत येत नाहीत अथवा शाळा सोडतात अशा 9 ते 14 वयोगटातील मुलांसाठी अंशकालीन शिक्षण योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. या योजनेअंतर्गत शिक्षक व कार्यकर्त्यांचे मानधन वाढवावे.

ग्रामीण आदिवासी भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून त्या भागातील मुले शेतीचा हंगाम, पाऊस, सण इ. कारणांमुळे त्या हंगामात शाळेत येत नाहीत त्यासाठी शेतीच्या हंगामात सुट्टी देऊन त्याऐवजी उन्हाळ्यात शाळा सुरू ठेवावी. स्थानिक परिस्थितीनुसार शाळेचे वेळापत्रक व सुट्टीचे दिवस ठरवावेत.

शाळेत जाणा-या मुलांकडून मिळणारी रोजंदारी पालकांना मिळत नाही म्हणून मुलांना शाळेत येण्यास उत्तेजन मिळावे यासाठी वर्षाखेरीस मुलांच्या हजेरीपटानुरूप व अभ्यासातील प्रगती पाहून काही आर्थिक फायदा पालकांना करून दिल्यास त्याचा गळती कमी होण्यास फार मोठा परिणाम होईल, असे वाटते.

## भौतिक कारणांवर उपाय :-

6.3 1. आश्रमशाळांमध्ये सर्व विद्यार्थ्यांना पुरेल इतक्या खोल्या असाव्यात. या खोल्या भक्कम बांधकाम केलेल्या, भरपूर प्रकाश, खेळती हवा, पाणी, वीज या सोयींनी युक्त असाव्यात. शाळेच्या परिसरात वृक्षारोपण केलेले असावे. त्यामुळे शाळेतील वातावरण उल्हासित राहून विद्यार्थी शाळेत रममाण होतील व गळती कमी होईल.

2. आश्रमशाळेतील आजारी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र खोली उपलब्ध करून देण्यात यावी व आजारी विद्यार्थ्यांवर आश्रमशाळेत औषधोपचारांची व विश्रांतीची सोय व्हावी. अधीक्षकांनी त्यावर लक्ष ठेवावे. असे केल्याने आजारी विद्यार्थी घरी गेल्यावर आजारपणानंतरही शाळा बुडवून घरीच थांबतो ते प्रमाण कमी होईल व विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण कमी होऊन उपस्थितीचे प्रमाण वाढेल.

आश्रमशाळेतील इमारती जुन्या तर काही आश्रमशाळा कच्च्या व छपराच्या घरात भरतात. पावसाळ्यात या शाळांमधून पावसाचे पाणी गळते. जमिनीला ओल येते व मुलांना शाळेत बसण्यास जागाही शिल्लक नसते. अशा इमारती विद्यार्थ्यांच्या आरोग्यास घातक ठरतात. पालक मुलांना शाळेत पाठविण्यास नाखूष असतात. यासाठी शालेय इमारत विद्यार्थ्यांच्या आरोग्याचे हितरक्षण करणारी असावी.

३· प्रत्येक आश्रमशाळेत स्वच्छतागृह, पिण्याच्या पाण्याची बारमाही सोय, वीजेची सोय, खेळण्यासाठी क्रीडांगण व खेळाचे साहित्य आश्रमशाळेमध्ये उपलब्ध असावे· यामुळे मुले शाळेकडे आकर्षिली जातील व त्यांना शाळेची ओढ लागेल·

४· पालकांची शिक्षणाबद्दलची अनास्था कमी करण्यासाठी पालकांनाच प्रथम साक्षर केले पाहिजे· संध्याकाळच्या वेळी एक ते दीड तास पालकांसाठी प्रौढ साक्षरता वर्ग आदिवासी विभागात सुरु करण्यात यावेत· पालक व शिक्षक संघ स्थापन करून त्यांच्यापर्यंत शिक्षणाचे महत्व पटवून देणे, शिक्षण समिती नेमून वारंवार गैरहजर राहण्या-या मुलांच्या घरी जाऊन त्याला शाळेत पाठविण्याबाबत पाठपुरावा करणे·

५· दुर्गम आदिवासी भागातील आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढविणे व टिकवून धरणे यासाठी जिल्हा परिषदेमार्फत पंचायत समितीच्या पातळीवर एक "गट हजेरी अधिकारी" नेमण्यात यावा· या "गट हजेरी अधिका-याकडे" आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे नियंत्रण, आश्रमशाळांना अचानक भेटी देणे, तपासणी करणे व विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीची कारणे जाणून घेऊन त्यावर सल्ला देणे व मार्गदर्शन करणे, शिक्षक पालक सभा घेऊन मार्गदर्शन करणे, शिक्षणाचे महत्व पटवून देणे इत्यादी कामे सोपवावीत·

६· आश्रमशाळेची प्रतिमा उज्वल करण्यासाठी व तिचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी प्रथम वसतीगृह विभाग अलग होणे अत्यावश्यक आहे· शाळेचे वेगळेपण विद्यार्थ्यास वाटावयास हवे· शालेय व्यवस्थापन व वसतीगृह कारभार एकत्र असल्यामुळे विद्यार्थ्यांचे लक्ष अभ्यासाकडे न जाता जेवणाकडे जास्त असते·

७· शालेय व्यवस्थापन व वसतीगृह एकत्र असल्याने तथाकथित स्थानिक पुढारी प्रशासकीय अधिकारी यांना वसतीगृह हेच आश्रमशाळेतील चौकशीचे एकमेव केंद्र बनले आहे· या व्यतिरिक्त शैक्षणिक मूल्यमापन, अवलोकन व शाळेतील उपस्थितीवर उपाय योजना करीत नाहीत· केवळ आदिवासी मुलांना जगविणे हेच आश्रमशाळेचे उदिष्टय नसावे· तेव्हा या बाबतीत कार्यकर्ते व पुढा-यांनी वसतीगृहातील चौकशीमध्ये हस्तक्षेप करण्याऐवजी शाळेचा शैक्षणिक दर्जा व शैक्षणिक मूल्यमापन केल्यास योग्य होईल व शिक्षकही जागरूक राहतील·

८· प्राथमिक शाळेतील मुलांचे आरोग्य उत्तम रहावे व त्यांची शाळेतील उपस्थिती टिकून रहावी यासाठी प्राथमिक शाळेतील मुला-मुलींची आरोग्य तपासणी दरवर्षी केली जावी· ही जबाबदारी जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे असावी· सदर विभागाने प्रत्येक विद्यार्थ्याच्या आरोग्य तपासणीचे नोंदपत्र ठेवावे·

९· बहुतेक आश्रमशाळा दुर्गम व डोंगराळ भागात आहेत· अशा ठिकाणी दळणवळण व

इतर नागरी सुविधांची सोय नाही. त्याठिकाणी वेळप्रसंगी आपत्तीच्या वेळी धडपड करण्यासाठी संपर्क साधता येत नाही. शिवाय दळणवळणाअभावी वरिष्ठ अधिकारी व पदाधिकारी अशा आश्रमशाळांना भेटी देऊन तपासणी किंवा मार्गदर्शन करु शकत नाही. अशा वेळेला शाळांचा दर्जा चांगला राखला जात नाही. यासाठी दळणवळणाची चांगली सोय करावी व बारमाही रस्त्यांची सोय व्हावी.

## 6.4 सामाजिक कारणांवर उपाय :-

1. दुर्गम भागातील आदिवासींसाठी प्रौढ साक्षरता मोहिम सुरु करण्यात यावी व साक्षरतेचा प्रसार वाढविण्यात यावा. सायंकाळी साक्षरता वर्ग पालकांसाठी सुरु करण्यात यावेत. त्याचबरोबर आरोग्य साक्षरता मोहिमेचा प्रचार करुन कुटुंबातील वातावरण बदलून मुलांच्या शिक्षणास पोषक कसे होईल, असे पहावे.

2. आदिवासी समाजावर मंत्र, तंत्र, भगताँगिरी, अंगात येणे, अशासारख्या अंधश्रध्देचा पगडा फार मोठया प्रमाणावर बसलेला आहे. तो कमी करण्यासाठी रेडिओ, दूरसंचार, यासारखी प्रचार माध्यमे व अंधश्रध्दा निर्मूलन समिती सारख्या स्वयंसेवी संस्था, तरुण मंडळे, ग्रामोध्दार मंडळे या संस्थामार्फत प्रचार करुन अंधश्रध्देचा पगडा कमी करावा. सांस्कृतिक कार्यक्रमांनी अंधश्रध्दा कमी करण्याचा प्रयत्न करावा.

3. बालविवाहांची पध्दत कायद्याने जरी बंद आहे तरी आदिवासी भागामध्ये बालविवाहाची प्रथा अद्यापही मोठया प्रमाणावर चालू आहे. ही पध्दत बंद करण्यासाठी त्याच समाजातील युवकांनी पुढाकार घेऊन ही प्रथा बंद करण्यासाठी प्रयत्न करावेत.

4. परंपरागत व्यवसाय करण्यासाठी मुले शाळा सोडतात. त्यांना शिक्षणामुळे त्याच व्यवसायात आधुनिक तंत्रज्ञान वापरुन कसा फायदा होईल हे पटवून देणे इष्ट आहे. हे ज्ञान वापरण्यास शिक्षण घेणे महत्वाचे असते, असे पटवून दिल्यास गळती कमी होण्यास मदत होईल.

5. शिक्षण घेतलेल्या मुलांना स्थानिक पातळीवर उद्योगधंदे उपलब्ध करुन दिले तर शिक्षणामुळे मुले कुटुंबांना दुरावतात, ही भावना कमी होईल.

6.5 प्रचलित शिक्षण पध्दती बदलणे :-

1. अभ्यासक्रम :-

सध्याचा अभ्यासक्रम दैनंदिन जीवनाशी निगडीत नाही. शिक्षण घेतलेले लोकही जीवनामध्ये अपयशी ठरतात, असा समज समाजात झाला आहे. त्यामध्ये बदल करून स्थानिक परिस्थितीप्रमाणे उद्योगधंदे, व्यवसाय, कलात्मक शिक्षण यांचा अभ्यासक्रमामध्ये अंतर्भाव करणे जरूरीचे आहे.

बहुतांश स्त्रिया ( मुली ) कौशल्याची कामे अधिक उत्तमरितीने करू शकतात. स्त्रियांचा वेग, चापल्य, समायोजकता यांचा योग्य वापर करून घरगुती उद्योगाचे प्रशिक्षण देण्यात यावे. जेणेकरून शिक्षण घेतल्यानंतर पाल्य आपल्या पायावर उभे राहू शकतील.

2. अभ्यासक्रम ग्रामीण व आदिवासी मुलांचा विचार करून ठरवावा. तो सध्या शहरातील मुले डोळ्यासमोर ठेवून आखला जातो. त्याऐवजी ग्रामीण मुलांना उपलब्ध असलेल्या सोयींचा विचार करून अभ्यासक्रम ठरविल्यास गळती कमी होईल.

आदिवासी भागातील मुलांना घरी व शेतात काम करावे लागते. तसेच लहान मुलांना सांभाळणे हे त्यांचेच काम, 10 ते 5 शाळेची वेळ, उशीरा शाळेत आल्यावर शाळेत शिक्षा, घरची कामे न केल्यास शाळा सोडून टाकण्याची शिक्षा, यासाठी आदिवासी भागातील मुलांना त्यांच्या वेळेच्या सोयीनुसार व वातावरणानुसार शाळा व अभ्यासक्रम आखण्यात यावा.

3. शिकविण्याची पध्दत :-

आदिवासी भागातील काही जमातीची भाषा वेगळी आहे. त्यामुळे इ.1 ली ते 4 थी पर्यंत खालील पध्दतीचे शिक्षण असावे म्हणजे विद्यार्थी शाळेमध्ये आकर्षिले जातील व शिक्षण पूर्ण करू शकतील.

इयत्ता 1 ली मध्ये बोलीभाषेतून शिक्षण असावे. त्यामुळे मुलांना शिक्षणाविषयी भिती वाटणार नाही.

इयत्ता 2 री मध्ये प्रथम काही दिवस बोलीभाषा व प्रांतिक भाषेतून शिकवावे. दोन्ही भाषेतील समांतर शब्द समजावून सांगावे व नंतर पुढे पुढे फक्त प्रांतिक भाषेतूनच शिक्षण द्यावे.

इयत्ता 3 री ते 4 थी मध्ये फक्त प्रांतिक भाषेतूनच शिकवावे. भाषेप्रमाणेच गणित हा विषयसुध्दा आदिवासी भागात उपलब्ध असलेल्या वस्तु दाखवून त्याच्या आधाराने बेरजा, वजाबाक्या शिकवाव्यात, तो ज्या मापाने, वजनाने बाजार करतो तीच मापे, वजने व स्टँडर्ड वजने, मापे यांचा संबंध समजावून शिक्षण देणे. आरोग्य, स्वच्छता, अन्न, वस्त्र, निवारा, विज्ञाननिष्ठा ह्या बाबींचा समावेश शिक्षणामध्ये केलेला असावा.

4. शिक्षक वर्ग :-

आदिवासी भागात काम करणा-या शिक्षकाला त्या भागातील भाषेची संस्कृतीची माहिती असणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्यात यावे.

आश्रमशाळेवर शक्यतो आदिवासी शिक्षक नेमावेत. परंतू त्यांच्याकडून मुलांची बौध्दिक पात्रता, भाषाशैली व संस्कार इतर समाजाबरोबर तयार होईल, असे पहावे.

सेवाभावी ध्येयनिष्ठ असे शिक्षक नेमावेत. नुसते पगारापोटी शिक्षक फारसे उपयोगी पडत नाहीत. कारण ते सतत आदिवासी भागातून शहरी भागात बदली करुन घेण्यासाठी प्रयत्न करतात. याचा मुलांच्या शिक्षणावर परिणाम होतो.

आदिवासी शिक्षक नेमतांना शिक्षा म्हणून न नेमता उलट त्याला बढती देऊन पाठवावे. आश्रमशाळेतील सर्व शिक्षकांच्या राहण्याची व्यवस्था व्हावी, यासाठी आदिवासी भागात राहू इच्छिणा-या शिक्षकांना नेमणूकीच्या वेळी सक्तीने निश्चित कालावधी देऊन नेमणूक व्हावी म्हणजे तेथे काम करण्याची त्यांच्या मनाची तयारी होईल.

5. मुलींसाठी आत्मसन्मान व स्वसंरक्षणात्मक शिक्षण :-

मुलींमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल असा अभ्यासक्रम आज अस्तित्वात नाही. मुलींसाठी स्वसंरक्षणात्मक अभ्यास नसल्याने सामाजिक असुरक्षितता, हुंडाबळी, बलात्कार अशा प्रकारामध्ये वाढ होत असते. असे प्रकार होऊ नयेत म्हणून आश्रमशाळेत आठवड्यातून एकदा "कराटे" सारखे प्रशिक्षण देण्यात यावे.

6• जीवनावश्यक शिक्षणाचा समावेश व्हावा :-

प्रस्थापित शिक्षण पध्दतीत आपण इतिहास, भूगोल, व्याकरण इत्यादी विषय शिकतो• परंतू जीवनास आवश्यक व आयुष्यात प्रत्येकाला ज्या भूमिका करावयास लागतात त्याचे शिक्षणच काय तोंड ओळख देखील होत नाही म्हणून जीवनाशी सुसंगत शिक्षण हवे•

6•6 सर्वसामान्य सूचना :-

1• आश्रमशाळेसाठी पाणी व्यवस्था :-

सर्व्हेक्षणामध्ये असे आढळून आले की, बारमाही पाण्याची व्यवस्था फारच थोडया शाळांमध्ये आहे• काही बहुतेक आश्रमशाळांमध्ये पाण्याची अडचण आहे• परिणामी त्वचारोग मोठया प्रमाणावर आढळून येतो• या बाबतीत असे सुचवावेसे वाटते की, ज्या ठिकाणी बारमाही पाण्याची व्यवस्था होईल त्याच ठिकाणी आश्रमशाळांचे बांधकाम करण्यात यावे किंवा प्रथम आश्रमशाळेसाठी "बोअरवेल" च्या सहाय्याने पाणी उपलब्ध झाले तर तेथे आश्रमशाळा बांधण्यात याव्यात• थोडक्यात प्रथम पाण्याची व्यवस्था करून नंतरच आश्रमशाळांचे बांधकाम करण्यात यावे•

2• आश्रमशाळेतील शिक्षक पती पत्नीस एकाच शासकीय आश्रमशाळेत ठेवण्यात यावे• तसेच कमीत कमी तीन वर्षांशिवाय त्यांच्या बदल्या करू नयेत• त्यामुळे मुलांच्या शिक्षणावर विपरित परिणाम होणार नाही•

3• इ•1 ली ते 2 री च्या मुलांना पालकांच्या प्रेमाची गरज असते• अशा मुलांना "निवासी विद्यार्थी" म्हणून न घेता डे स्कॉलर म्हणून प्रवेश द्यावा, जेणेकरून शाळा संपल्यावर मूल आपल्या घरी राहील•

4• आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची वर्षातून कमीत कमी एक शैक्षणिक सहल जवळच्या एका जिल्हयात आयोजित करण्यात यावी• यामुळे मुलांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वाढीस लागेल व शैक्षणिक गोडी वाढेल•

आदिवासी लोकशिक्षण, संगीतकला व परंपरागत हस्तकला कौशल्य शिकविण्यात यावे की, जेणेकरून आदिवासी संस्कृतीचे जतन होईल• तसेच, आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांकडूनच आदिवासी लोकनृत्य, लोककथा, लोकगीते यांच्या स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात• अशारितीने लोकसाहित्य व संस्कृतीची जपणूक करून त्यास आदिवासी परंपरागत कला व संस्कृती म्हणून उत्तेजन देण्यात यावे•

5. आदिवासी लोकसंख्या असलेल्या जिल्ह्यात कमीत कमी एक "आदर्श शासकीय आश्रमशाळा" शिक्षण विभागाने निवडावी. या आश्रमशाळेचा आदर्श इतर आश्रमशाळांच्या प्रगतीच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. राज्य शिक्षण संस्थेने या कामासाठी जिल्हा शिक्षण अधिका-यांमार्फत विशेष प्रयत्न करावेत.

6. आदिवासी विभागातील विद्यार्थ्यांना ज्यांना शिक्षण घेणे शक्य नाही अशांना धंदेविषयक तसेच व्यवसाय शिक्षण द्यावे, ज्यामुळे त्यांना रोजगार मिळणे शक्य होईल.

7. आदिवासी आश्रमशाळांवर शिक्षण विभागाचे नियंत्रण कमी असल्याचे आढळले. या बाबतीत असे सुचवावेसे वाटते की, शिक्षण विभागातील आश्रमशाळांतील नियंत्रण, भेटी व तपासणी यंत्रणा अधिक दृढ करण्यात यावी. यामुळे आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा सुधारण्यास चांगली मदत होईल.

8. उपयोजना क्षेत्रामध्ये माध्यमिक शाळांची संख्या कमी असल्याचे आढळून आले. याबाबतीत असे सुचवावेसे वाटते की उपयोजना क्षेत्रामध्ये पोस्टबेसिक आश्रमशाळांची संख्या वाढविण्यात यावी. तसेच उपयोजना क्षेत्रातील तांत्रिक शिक्षण संस्थांची संख्या वाढविण्यात यावी.

9. आश्रमशाळांतील शिक्षकांच्या नेमणुका आणि बदल्या काही वेळा शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर केल्या जातात. त्यामुळे शालेय कामकाजावर मोठया प्रमाणावर परिणाम होतो. हे टाळण्यासाठी प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या नेमणुका व बदल्या शालेय वर्ष सुरु होण्यापूर्वीच केल्या जाव्यात.

आदिवासी व दुर्गम भागातील आश्रमशाळांमध्ये बाहेरून आलेले शिक्षक टिकून राहत नाहीत व ते आपल्या बदलीच्या प्रयत्नात सतत असतात. याचा शालेय कामकाजावर अनिष्ट परिणाम होतो. म्हणून अशा भागात त्या भागातील रहिवासी असलेले शिक्षकच नेमावेत. जरुर पडल्यास अशा नेमणुकांच्या बाबतीतील शैक्षणिक अर्हतेची अट शिथिल करण्यात यावी.

10. आदर्श आश्रमशाळा निर्मितीसाठी शिक्षकांचे मनोबल ३ वाढविण्याची गरज आहे. त्यांना शाळेविषयी आत्मियता व आपुलकी निर्माण व्हावयास हवी. यासाठी आदर्श शिक्षकांची निवड करण्यात येऊन गुणगौरव आणि सत्कार होणे आवश्यक आहे.

10.(अ) इंग्रजी विषयासाठी सर्व आश्रमशाळांमधून स्वतंत्र शिक्षकांची नेमणूक करण्यात यावी.

11. आश्रमशाळांमध्ये जी रिक्त पदे आहेत ती त्वरीत भरण्यात यावीत. पोस्टबेसिक

आश्रमशाळेत इंग्रजी, गणित व शास्त्र या विषयासाठी स्वतंत्र शिक्षक त्वरीत नेमण्यात यावेत.

12. शासकीय आश्रमशाळा या आदर्श आश्रमशाळा होण्यासाठी खालील प्रयत्न होणे जरुरीचे आहे.

§अ§ शैक्षणिक वातावरण :- आश्रमशाळा अंतर्गत व आश्रमशाळा बाह्य परिसर सुंदर, प्रसन्न असणे आवश्यक आहे.

§ब§ शैक्षणिक परिसर :- शाळेच्या सभोवती झाडे लावलेली असावीत. तसेच समोर बगिचा असावा. शाळेला पुरेसे व चांगले क्रीडांगण असावे.

§क§ वर्ग सजावट :- पाहणीमध्ये आश्रमशाळांमधील वर्ग प्रसन्न आढळून आले नाहीत. वर्गात शैक्षणिक माहिती दर्शविणारे तक्ते, भित्तीपत्रके, नकाशे, तारण चित्रे इत्यादी लावलेले असावेत. सुयोग्य ठिकाणी सुविचार लिहिलेले असावेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या वाचनात सतत शैक्षणिक माहिती आल्याने त्यांचे अध्ययन दृढ होते व वर्ग सुशोभित दिसतो.

§ड§ विद्यार्थी संख्या :- इ.4 थी पर्यंत शिक्षकांची संख्या 40 ते 45 चे दरम्यान असते. इ.5 वी पासून विद्यार्थी संख्येत घट होते. 8वी चे वरचे वर्गात विद्यार्थी संख्या अत्यंत कमी होते. यासाठी वरचे वर्गातील विद्यार्थ्यांना अधिक संख्येने प्रवेश द्यावा व डे स्कॉलर विद्यार्थ्यांची संख्या वाढविण्यात यावी. जेणेकरुन शिक्षकांची क्षमता व शासनाच्या खर्चाच्या क्षमतेचा सुयोग्य व पुरेसा वापर होईल.

§इ§ शैक्षणिक साहित्य :- आश्रमशाळांना पुरविण्यात येणारे शैक्षणिक साहित्य शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी त्वरीत पुरविण्यात यावे. विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणारे शैक्षणिक साहित्य शाळा सुरु झाल्यावर पहिल्याच आठवड्यात पुरविण्यात यावे. विद्यार्थ्यांना मिळणा-या वह्यांमध्ये क्लासवर्कसाठी वेगळ्या वह्या व गृहपाठासाठी वेगळ्या वह्या पुरविण्यात याव्यात. लहान वर्गांना पुरविण्यात येणा-या पाट्या त्वरीत फुटतात व त्यानंतर पाटी पुरविण्यात येत नाही. यासाठी वर्षभर टिकेल अशा चांगल्या प्रकारच्या पाट्या विद्यार्थ्यांना पुरविण्यात याव्यात.

(प) विद्यार्थ्यांची उपस्थिती- विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीत विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर प्रतिकूल परिणाम होतो. सण, उत्सव, शेती हंगामातील कामे इत्यादीमुळे विद्यार्थी सतत गैरहजर राहत असतो. यासाठी आश्रमशाळांना स्थानिक परिस्थितीनुसार सुट्ट्या देण्यात याव्यात.

13. रायगड, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये स्थलांतरामुळे गळती होते. यासाठी तेथे विशिष्ट हंगामापुरत्या (सिझनल) शाळा स्थापन करण्यात याव्यात. याकरिता जिल्हा परिषदेचे सहकार्य घेण्यात यावे.

14. लहान मुलांचे मानसशास्त्र (Child Psycology) अवगत असणाऱ्या स्त्री शिक्षकांचे प्रमाण वाढविण्यात यावे. या शिक्षिका लहान मुलांच्या कलाने अभ्यासक्रम शिकवून शिक्षणात गोडी निर्माण करतील व लहान मुलांना प्रेम देतील.

15. जिल्हा परिषदेमधील शिक्षण अधिकाऱ्यांचे आश्रमशाळेतील शिक्षकांवरील नियंत्रण वाढविण्यात यावे, जेणेकरून आश्रमशाळेचा शैक्षणिक दर्जा सुधारेल.

16. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या शिक्षकांची गोपनीय अहवालामध्ये नोंद घेण्यात यावी.

6.7 शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थिनींसाठी महत्त्वाच्या शिफारशी :-

शासकीय आश्रमशाळेमध्ये 1989-90 अखेर 33,816 मुली शिक्षण घेत होत्या. सद्यस्थितीत आश्रमशाळेतील मुलींसाठी स्वतंत्र राहण्याची सोय व झोपण्याची सोय आहे. परंतु, मुलींसाठी स्वतंत्र संडास व बाथरूमची सोय नाही. त्यामुळे मुलींना आंघोळीची समस्या निर्माण होऊन आठवड्यातून एकदा नदी, ओढा, नाल्यावर आंघोळीसाठी जावे लागते. मुलींसाठी स्वतंत्र स्त्री कर्मचारी नाही. यासाठी खालील उपाययोजना करावी, असे वाटते.

1. स्त्री अधीक्षक-1, स्त्री शिपाई-1 व स्त्री कर्मचारी-1, पहारेकरी-1 यांची कायम स्वरूपी नेमणूक करावी.

2. मुलींसाठी स्वतंत्र संडास, बाथरूमची व्यवस्था व्हावी व तेथे मुलींना दररोज आंघोळीसाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, जेणेकरून मुली नदी-नाल्यावर आंघोळीस जाणार नाहीत.

3. पूर्व प्राथमिक स्तरावरील मुलींसाठी केस विंचरणे, कपडे धुणे व आंघोळी घालण्यासाठी स्वतंत्र स्त्री कर्मचारी किंवा दाईस हे काम द्यावे.

4. मुलींसाठी स्वतंत्र संस्कार शिबिर भरविण्यात यावेत. यामध्ये मुलींच्या व्यक्तीमत्व विकास, व्यवसाय शिक्षण व कला, त्यांच्या गुणांना वाव मिळेल. ही कामगिरी स्त्री अधीक्षकांवर सोपविण्यात यावी.

5. मुलींच्या शाळेच्या परिसरात जर कुणीही पुरुष आले तर त्यावर कडक नियंत्रण असावे व त्या बाबतीत कडक कारवाई करावी.

6. मुलींसाठी मासिक पाळी रजिस्टर ठेवण्यात यावे व त्याची नियमित तपासणी बालवाडी शिक्षकांनी करावी. मुख्याध्यापकांनी त्यावर नियंत्रण ठेवावे.

7. मुलींची वैद्यकिय तपासणी स्त्री डॉक्टरांकडून दर तीन महिन्यांनी करुन घ्यावी. त्यासाठी त्यांना मानधन देण्यात यावे.

थोडक्यात आश्रमशाळा व त्यातील प्रशासन ध्येय व मार्ग यातील तफावत या मुद्यांचा विचार करता आश्रमशाळा कुठेतरी कमी आहेत, असे वाटते. परंतू याचा अर्थ असा नव्हे की आश्रमशाळा काहीच करु शकत नाहीत.

आश्रमशाळेने जे कार्य केले ते कार्य कोणतीही दुसरी योजना करु शकत नाही. निश्चितच आश्रमशाळा हे विकासाचे उत्कृष्ट माध्यम आहे. फक्त त्यातील उणिवांकडे लक्ष दिले पाहिजे.

## परिशिष्ट – १

## "आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शाळेतील गळतीचा मूल्यमापन अहवाल:अभ्यास"

### प्रपत्र – १

### कुटुंब – पत्रक

### चौक क्र. १ – ओळख तपशिल

१] राज्य.......................... २] जिल्हा...................

३] तालुका/पंचायत समिती ...................

४] गांव ..........................५] पाडा/वाडी...............

६] पाड्याची/वाडीची लोकसंख्या........................

ब] पाड्यापासून/वाड्यापासून जवळच्या आश्रमशाळेचे अंतर .................

### चौक क्र. २ – कुटुंबविषयी माहिती

१] कुटुंब प्रमुखाचे नांव .... ................................

२] धर्म ..............................

३] अ] जात/जमात ..............................

ब] पोटजात/पोटजमात ..............................

४] कुटुंबातील एकूण व्यक्ती [ ] पुरुष, [ ] स्त्रिया

[ ] मुले

५] कुटुंबाचा व्यवसाय प्रमुख.................

दुय्यम.................

६] कसत असलेली जमीन [क्षेत्र एकरात] कोरड.............

बागायत.......... एकूण..............

७] कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न अंदाजे [१९९०-९१] चे. ..............................

टीप – वार्षिक उत्पन्न विचारताना कुटुंब प्रमुखाकडे असलेली जमीन, पशुधन, व्यवसाय, नोकरी करणारी माणसे ह्या गोष्टींचा विचार करून अंदाजित सरासरी उत्पन्न काढावे.

७] शाळेत न जाणाऱ्या मुला-मुलींचा तपशील [६ ते १६] वर्षापर्यंतची मुले-मुली. ]

| अ. क्र. | नांव | मुलगा/ मुलगी | शाळा सोडते वेळी वय | कोणत्या वर्गात शाळा सोडली ? | शाळा सोडल्याचे कारण | मुलाचा सध्याचा कामाचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | | | | | | |
| २. | | | | | | |
| ३. | | | | | | |
| ४. | | | | | | |

८] आपल्या मुलांना पुन्हा शाळेत पाठविण्यासाठी कोणत्या सोई उपलब्ध कराव्यात असे आपणाला वाटते ?

अ]

ब]

क]

ड]

९. अ] कुटुंबातील परंपरागत व्यवसाय ..........................

ब] पालकांच्या या व्यवसायामुळे मुलांच्या शाळेत जाण्यावर / नापास होण्यावर काय परिणाम होतो ? होय/नाही

१०.] इतर अभिप्राय[शिक्षणाबाबत]

११] शाळेबद्दलचे आपले मत काय ? १]

२]

३]

........

७. शारिरीक तपासणी वेळेवर होत    १]
नसल्यास त्याची कारणे कोणती ?    २]
   ३]

८. आश्रमशाळेतील पुस्तकी शिक्षणा--    होय/नाही
शिवाय इतर विषयांचे शिक्षण
दिले जाते काय ?
असल्यास कोणत्या विषयाचे

९. आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना    होय/नाही
खेळण्यासाठी पुरेसे क्रिडांगण व
खेळाचे साहित्य उपलब्ध आहे काय ?
नसल्यास त्याची कारणे कोणती ?

१०. आश्रमशाळेंनी आपल्या शाळेतील    १]
सोई सुविधा वाढविण्यासाठी,    २]
पाठविलेले प्रस्ताव.

प्रस्तावाचे स्वरुप    १]
   २]
   ३]
   ४]

## <u>चौक नं. ५</u> -- <u>अध्यापन व परिक्षा पध्दती</u>

१. घटक नियोजन वार्षिक नियोजन व    होय/नाही
वेळापत्रका प्रमाणे अभ्यास घेतला
जातो का ?

२. अभ्यासक्रमाच्या बाबतीत मासिक/    होय/नाही
साप्ताहिक सभा होतात काय ?

३. दैनंदिन अध्यापनात कोणती अध्यापन    १]
पध्दती वापरतात ? [उदा. आख्यान    २]
पध्दती, प्रश्नोत्तर पध्दती, चर्चा    ३]
पध्दती इत्यादी]

४. वरीलपैकी कोणती अध्यापन पध्दती    १]
परिणामकारक वाटते ? का ?    २]

५. अध्यापन करताना स्पष्टीकरणासाठी कोणत्या बोलीभाषेचा उपयोग करता ? — होय/नाही

६. त्याचा कोणता परिणाम दिसून येतो? कसा ?
१]
२]

७. अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जास्तीचे वर्ग घेतले जातात काय ? — होय/नाही

८. कोणत्या विषयासाठी जास्तीचे वर्ग घेतले जातात ?
१]
२]

९. त्याचा परिणाम कोणता दिसून येतो ?
१]
२]

१०. अध्यापन दर्जेदार होण्यासाठी आश्रमशाळेत इतर कोणते उपक्रम राबविले जातात ?
१]
२]
३]

११. सध्या आपल्या शाळेत मुलांना वरचे वर्गात घालण्यासाठी कोणती पध्दती अवलंबिली जाते ? १]

ए] प्रश्नपत्रिका कोण काढतात ? २]

बी] उत्तर पत्रिका कोण तपासतात ? ३]

सी] या पध्दतीत कोणत्या सुधारणा सुचवाव्याशा वाटतात ? ४]

डी] व त्यामुळे कोणत्या प्रकारचा बदल होईल असे आपणास वाटते? ५]

१२. तुमच्या शाळेत परिक्षा पध्दती आहे का? — होय/नाही

तुमच्या मते परिक्षा पध्दतीत जाणवणाऱ्या उणीवा कोणत्या ?
१]
२]
३]

१३. त्या कशाप्रकारे दूर करता ?
१]
२]
३]

१४. त्याचा कोणता परिणाम दिसून येतो ?
१]
२]

## चौक क्र. ६ – आश्रमशाळेच्या अडचणी व सूचना

| | | |
|---|---|---|
| १. | आश्रमशाळेच्या अडचणी आदिवासी विकास अधिकाऱ्यांकडून सोडविल्या जातात काय ? | होय/नाही |
| २. | आपल्या आश्रमशाळेस उपसंचालक, प्रकल्प अधिकारी, आदिवासी विकास अधिकारी, आदिवासी विकास निरीक्षक, उप शिक्षण अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व इतर अधिकारी यांनी दिलेल्या मागील दोन वर्षातील भेटींची संख्या तारखेसह लिहा. | १] प्रकल्प अधिकारी..........<br>२] उपसंचालक................<br>३] आ. वि. अ................<br>४] आ. वि. निरीक्षक..........<br>५] उप शिक्षण अधिकारी..............<br>६] शिक्षण विस्तार अधिकारी..............<br>७] इतर अधिकारी........... |
| ३. | शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांनी मागील दोन वर्षात सर्वसाधारण तपासणी व वार्षिक तपासणी केली का ? | होय/नाही |
| | असल्यास वर्ष व तपासणी केल्याचा दिनांक लिहा. | वर्ष १९८९-<br>वर्ष १९९०- |
| ४. | तक्रारी केली जाते का ? | होय/नाही |
| | मागील वर्षाच्या व या वर्षाच्या तक्रारीतील फरक लिहा ? | १]<br>२] |
| ५. | शाळेच्या प्रमुख अडचणी कोणत्या ? | १]<br>२]<br>३] |

......

## परिशिष्ट क्र. ३

## आश्रमशाळांतील मुख्याध्यापकांनी भरावयाची माहिती

### प्रपत्र क्रमांक- ३

**घटक क्रमांक-१** आश्रमशाळेची सर्वसाधारण माहिती :-

| | | |
|---|---|---|
| १. | आश्रमशाळेचे नांव व पूर्ण पत्ता | |
| २. | आश्रमशाळा प्रायमरी आहे की, पोस्टबेसिक | प्राथमिक/पोस्टबेसिक |
| ३. | आश्रमशाळेला जोडून बालवाडी चालविली जाते काय ? | होय/नाही |
| ४. | आश्रमशाळेत कितवीपर्यंत वर्ग भरतात. | |
| ५. | आश्रमशाळेतील सन १९९०-९१ ची जमातीनिहाय विद्यार्थी संख्या | अनुसूचित जमाती ....<br>अनुसूचित जाती .....<br>अन्य .... |

**घटक २** आश्रमशाळेची इमारत व वसतीगृहाबाबत.

| | | |
|---|---|---|
| १. | आश्रमशाळा गांवापासून किती अंतरावर आहे | ........ कि.मी. |
| २. | आश्रमशाळेची इमारतीचा तपशील (उदा. इमारतीचा प्रकार कच्ची/पक्की) | पक्की/कच्ची |
| ३. | आश्रमशाळेची इमारत शासकीय मालकीची आहे की भाड्याची आहे ? | मालकीची/भाड्याची |
| ४. | आश्रमशाळेची इमारत विद्यार्थ्यांसाठी पुरेशी आहे काय ? | होय/नाही |
| ५. | अपुरी असल्यास किती विद्यार्थ्यांना पुरते | विद्यार्थी संख्या..... |

..३

६. पुरेशी नसल्यास आणखी किती जागा आवश्यक आहे. — खोल्या

७. आश्रमशाळेत शिक्षकांसाठी व कर्मचा-यांसाठी निवासस्थाने उपलब्ध आहेत काय ? — होय/नाही

८. असल्यास शिक्षकांकरिता किती व वर्ग-४ कर्मचा-यांकरिता किती — शिक्षकांसाठी........
वर्ग ४ कर्मचा-यांसाठी......

९. वसतीगृहात प्रत्यक्ष मुक्कामास असणा-या विद्यार्थ्यांची संख्या. — विद्यार्थी संख्या

पोक- ३

१. प्री बेसिक आश्रमशाळेसाठी

| अ.क्र. | साल | शिक्षकाचे नांव | शै. पात्रता | प्रशिक्षित/अप्रशिक्षित | शिकविण्याचा विषय |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | १९८८ | | | | |
| २. | १९८९ | | | | |
| ३. | १९९० | | | | |
| ४. | १९९१ | | | | |

२. पोस्ट बेसिक आश्रमशाळेसाठी

| अ.क्र. | साल | शिक्षकाचे नांव रिक्त असल्यास रिक्त म्हणावे. | शैक्षणिक पात्रता पदवी / पदव्युत्तर | प्रशिक्षित/ अप्रशिक्षित | प्रत्यक्ष शिकविण्याचा विषय |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | १९८८ | | | | |
| २. | १९८९ | | | | |
| ३. | १९९० | | | | |
| ४. | १९९१ | | | | |

## परिशिष्ट क्र. ५

### "आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या गळतीचा मूल्यमापन अभ्यास अहवाल"

### आश्रमशाळेतून नापास होणाऱ्या किंवा गळणाऱ्या मुलांसाठी प्रश्नावली

चौक क्र. १ : ओळख तपशील

१. विद्यार्थ्याचे नांव : ........................................

२. जिल्हा................ तालुका................ गांव..............

३. घरापासून आश्रमशाळेचे अंतर : मैल............ कि.मी.............

४. वडिलांचा व्यवसाय.......... जोडधंदा.............. वा. उत्पन्न..........

५. कुटुंबातील एकूण व्यक्ती.......... पुरुष.......... स्त्रिया...... मुले.......

चौक क्र. २ : शाळा सोडण्याविषयीचा तपशील

६.

| शाळा सोडते वेळी वय | कितवीपासून शाळा सोडली | शाळा सोडण्याचे कारण | सध्याच्या कामाचा तपशील | मिळणारा रोज |
|---|---|---|---|---|
| | | | | |

७. शासनाने दरमहा पैसे देण्याची व्यवस्था केली तर शाळेत पुन: जाऊ शकाल का ? होय/नाही

८. शाळा सोडून जाऊ नका या विषयी शिक्षकांनी काय मार्गदर्शन केले ? किंवा समजावून सांगितले ?

९. आश्रमशाळेत सर्व खर्च शासन करते तरीसुध्दा शाळा मध्येच सोडण्याचे कारण काय ?

विद्यार्थ्याची सही

## परिशिष्ट क्र. २

## आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

आदिवासी उपयोजना व उपयोजना क्षेत्राबाहेरील बेसिक व पोस्ट बेसिक आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या गळतीचा मूल्यमापन अभ्यास अहवाल १९९१-९२.

.......

## शिक्षण विभागाचे अधिकारी/सामाजिक कार्यकर्त्यांच्या अभिप्रायार्थ प्रश्नावली [विचारधारा]

### प्रपत्र क्र. २

### चौक क्र. १ - प्रास्ताविक

शिक्षण क्षेत्रातील अधिकाऱ्यांचे/सामाजिक कार्यकर्त्यांचे नांव..............

.....................................

हुद्दा/पद .....................

मुख्यालय/पत्ता .....................................

.....................................

### चौक क्र. २

१. पंचायत समिती/शिक्षणक्षेत्रात किती वर्षे काम करीत आहात ? — वर्षे................

ब] कोणत्या पातळीवर — ग्राम/तालुका/जिल्हा/राज्य

२. मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शाळेतील गळतीबाबत आपली कारणमिमांसा स्पष्ट करा.
१]
२]
३]

३. सदर गळती थांबविण्यासाठी कोणती उपाययोजना करावी असे आपणास वाटते ?
१]
२]
३]
४]

४. जिल्हा परिषद, इतर खाजगी शाळा व आश्रमशाळा यांच्यातील तुलनात्मक गळतीची कारणमिमांसा स्पष्ट करा.
१]
२]
३]
४]
५]

........